## प्रकरण - पाचवे

## माहितीचे संकलन, विशदीकरण आणि विश्लेषण

संशोधनाच्या संदर्भात कोणती माहिती मिळवायची, ती केंव्हा मिळवायची व कशी मिळवायची याचे नियोजन संशोधनाच्या सुरुवातीस हवे असते. मिळालेल्या माहितीच्या अर्थनिर्वचनासाठी कोणते संख्याशास्त्र वापरावयाचे हे मुद्दा अगोदरच ठरवावे लागते त्यामुळे संशोधन प्रक्रियेला एक दिशा मिळते. अनावश्यक माहिती गोळा केली जात नाही. माहितीच्या दर्जावर संशोधनाचा दर्जा अवलंबून असतो. ही माहिती संशोधनाच्या विविध साधनाव्दारे जमा करण्यात येते. सदरहू माहिती संख्यात्मक व गुणात्मक अशा स्वरूपाची असते.

संशोधकाने विविध साधनांच्याव्दारे जी माहिती संकलित केलेली असते त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित करून त्या माहितीची फेररचना करावी लागते. तसे केले नाही तर माहितीच्या ढिगातून काहीही निष्पन्न होणार नाही. त्या माहितीतून योग्य अर्थ काढण्यासाठी पुनर्रचना, फेररचना व पुर्नमांडणी करणे आवश्यक असते. या प्रक्रियानाच संकलित माहितीवर विविध प्रक्रिया करणे असे म्हणतात.

या संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून सोलापूर शहर साक्षरता अभियानात सदर कार्य करताना शिक्षकांना आलेल्या विविध समस्यांची माहिती प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण या संशोधन साधनाव्दारे व तंत्राव्दारे मिळविण्यात आलेली आहे. प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षणाव्दारे प्राप्त झालेल्या माहितीचे या प्रकरणात संकलन आणि विश्लेषण करण्यात आले आहे.

## ५.१ निरक्षरांचे सर्वेक्षण करताना आलेल्या अडचणी

कोणतेही कार्य करण्यासाठी माहिती ही संकलित करावी लागते. त्याचप्रमाणे साक्षरता अभियान राबविण्यापूर्वी निरक्षरांचे सर्वेक्षण करुन संख्या मिळविणे आवश्यक होते. महाराष्ट्र शासनाने २००० सालापर्यन्त महाराष्ट्रात शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट समोर ठेवून त्यासाठी सापूर्वीच राज्यातील चोवीस जिल्ह्यात "संपूर्ण साक्षरता अभियान मोहिम" राबविण्यास सुरुवात केलेली आहे. सन १९८८ पासून राष्ट्रीय साक्षरता मोहीम सुरु झाली. महाराष्ट्रात "सिंधुदुर्ग" हा पहिला जिल्हा शंभर टक्के साक्षर झाला. संपूर्ण साक्षरता अभियान या मोहिमेअंतर्गत १९९५-९६ या वर्षाकरिता सोलापूर जिल्ह्याची निवड केली होती. या अभियानाअंतर्गत १५ ते ३५ वयोगटातील स्त्री-पुरुष निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट होते.

यासाठी प्रथम १५ ते ३५ वयोगटातील निरक्षर स्त्री-पुरुषांची संख्या मिळविणे जरुरीचे होते त्यासाठी मार्च-एप्रिल १९९५ मध्ये प्राथमिक शिक्षकांना वार्डनिहाय कुटुंबे सर्वेक्षणासाठी ठरवून दिली गेली होती. त्यानुसार सर्वेक्षण करुन माहिती मिळवितांना शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी आल्या त्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केला आहे. शिक्षकांना सर्वेक्षण करताना आलेल्या अडचणी पुढीलप्रमाणे.

**कोष्टक क्रमांक १ [अ]**

गलिच्छ वस्त्या/वाडयातून फिरावे लागणे

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | गलिच्छ वस्त्या/वाडयातून फिरावे लागले. | २९ | २५.८९ |
| २] | गलिच्छ वस्त्या/वाडयातून फिरावे लागले नाही. | ८३ | ७४.११ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, गलिच्छ वस्त्या व वाडयातून फिरावे लागले अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.८९ टक्के आहे. गलिच्छ वस्त्या व वाडयातून फिरावे लागले नाही असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण ७४.११ टक्के आहे. यावरुन असे सांगता येते की, गलिच्छ वस्त्यातून फिरावे लागले असे म्हणणा-यांचे प्रमाण अत्यल्प आहे तरीही या वस्त्यातून स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

साक्षरता अभियानात निरक्षरांना आरोग्यविषयक माहिती देताना स्वच्छतेचे महत्वही सांगणे आवश्यक आहे. अशा गलिच्छ वस्त्यातून फिरावे लागले नाही असे म्हणणारे प्रतिसादक जास्त आहेत यावरून असे सांगता येते की, पहिल्या तीन विभागात आरोग्यविषयक व स्वच्छतेविषयी जाणीव जागृती झालेली आहे.

कोष्टक क्रमांक १ [ब]

निरक्षरांच्या भेटीकरीता किती वेळा फिरावे लागणे

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | निरक्षरांच्या भेटीसाठी अनेक वेळा जावे लागले. | ३९ | ३४.८२ |
| २] | एकदाच गेल्यानंतर भेट झाली. | ७३ | ६५.१८ |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरील माहितीवरून असे म्हणता येईल की, निरक्षरांच्या भेटीसाठी अनेक वेळा जावे लागले असे म्हणणारे प्रतिसादक ३४.८२ टक्के आहेत तर एकाच वेळी भेट दिल्यानंतर भेट झाली असे म्हणणारे प्रतिसादक ६५.१८ टक्के आहेत. यावरून निरक्षरांची भेट घेताना फारशी अडचण आली नाही. तरीही अनेकवेळा भेटी देऊन माहिती मिळविण्याचे काम ३४.८२ टक्के प्रतिसादकानी केलेले आहे.

## कोष्टक क्रमांक १[क]

सर्वेक्षणासाठी भाषिक समस्येची अडचण आली का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | भाषिक समस्येची अडचण आली | ३६ | ३२.१४ |
| २] | भाषिक समस्येची अडचण आली नाही | ७६ | ६७.८६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, सर्वेक्षण करण्यासाठी गेल्यानंतर भाषिक समस्या निर्माण झाली असे म्हणणारे प्रतिसादक ३२.१४ टक्के आहेत तर भाषिक समस्या निर्माण झाली नाही असे म्हणणारे प्रतिसादक ६७.८६ टक्के आहेत. यावरुन असे म्हणता येते की भाषिक समस्या निर्माण झाली म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या अत्यल्प आहे. सोलापूर शहर हे बहुभाषिक असल्याने ही समस्या आलेली आहे. सर्वात जास्त अडचण तेलगू भाषीकाची आढळून आली. तरी तीही अडचण निवारण्याचा प्रयत्न शिक्षकांनी इतर शिक्षकांच्या सहाय्याने करुन माहिती मिळविली.

## कोष्टक क्रमांक १ [ड]

या वयात शिकून काय करायचे ? यासारखे प्रश्न विचारणे

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | या वयात शिकून काय करायचे ? शिकल्यावर नोकरी/सवलती देणार का ? असे प्रश्न विचारले. | ७५ | ६६.९६ |
| २] | अशा प्रकारचे प्रश्न विचारले नाहीत. | ३७ | ३३.०४ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, निरक्षर सर्वेक्षणाच्या वेळी जेव्हा निरक्षराशी प्रत्यक्ष मुलाखत झाली तेंव्हा या वयात शिकून काय करायचे. शिकल्यानंतर नोकरी देणार का ? कांही सोयी, सवलती मिळणार का ? अशा प्रकारचे प्रश्न विचारत होते असे सांगणारे प्रतिसादक ६६.९६ टक्के आहेत तर अशा प्रकारचे प्रश्न विचारले गेले नाहीत असे म्हणणारे प्रतिसादक ३३.०४ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, निरक्षरांना शिकवण्यासंबंधी एखादे प्रलोभन बक्षीस त्यात दिल्यास निरक्षर वर्गात येण्यास उत्साह दाखवतील. नाहीतर आर्थीक विवंचनेमुळे ते आपले रोजचे काम सोडून नियमित साक्षरता वर्गात उपस्थित राहाणे कठीण आहे.

कोष्टक क्रमांक १ [इ]

निरक्षरांच्या भेटी देण्यास आलेल्या अडचणी

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे लोक सकाळी उठून कामास जात त्यामुळेही भेटी देणे लवकर जमले नाही. | ९७ | ८६.६१ |
| २] | अशा प्रकारची अडचण आली नाही. | १५ | १३.३९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने, नव-याच्या व्यसनीपणामुळे ब-याचशा स्त्रिया सकाळी उठून कामास जात त्यामुळेही निरक्षरांच्या भेटी देण्यास विलंब झाला. शाळा करून वारंवार त्यांच्याकडे जावे लागले अशी अडचण निर्माण झाली असे म्हणणारे प्रतिसादक

८६.६१ टक्के आहेत. अशा प्रकारची अडचण निर्माण झाली नाही असे सांगणारे प्रतिसादक १३.३९ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे म्हणता येते की, आर्थिक मागासलेपणामुळे अज्ञान व निरक्षरतेत वाढ होत आहे. उदरनिर्वाहाकरिता दिवसभर काम करून पोट भरणे एवढाच दृष्टीकोन असतो त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व पटलेले नसते. काम करण्याशिवाय पर्यायही नसतो म्हणून शासनाने आर्थिक विषमता कमी करून उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविणे महत्त्वाचे आहे तरच ते शिक्षणाकडे वळू शकतील.

## ५.२ निरक्षरांचा सर्व्हे करताना वार्डातील नगरसेवकांची मदत

अशा प्रकारचे सामाजिक कार्य करताना संपूर्ण समाजाचा सहभाग त्यात सक्रीय असेल तरच साक्षरता अभियानसारखे कार्यक्रम पार पाडताना अडचणी येत नाहीत. वार्डप्रमुख या नात्याने त्या त्या वार्ड नगरसेवकांनी सहकार्य केल्यास त्या वार्डातील प्रत्येक घरापर्यंत ही चळवळ पोहचु शकते. या सोलापूर साक्षरता अभियानात वार्डातील नगरसेवकांनी मदत कितपत केली ते खालील कोष्टकावरून समजते.

**कोष्टक क्रमांक २**

निरक्षर सर्वेक्षण करताना वार्ड नगरसेवकांची मदत

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | निरक्षरांचा सर्व्हे करताना वार्डातील नगरसेवकांची मदत झाली. | ६० | ५३.५७ |
| २) | नगरसेवकांची मदत मिळाली नाही. | ५२ | ४६.४३ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, शिक्षकांना सर्व्हे करताना त्या वार्डातील नगरसेवकांनी मदत केली असे म्हणणारे प्रतिसादक ५३.५७ टक्के आहेत. नगरसेवकांनी सर्व्हे करताना मदत केली नाही असे म्हणणारे प्रतिसादक ४६.४३ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे समजते की, मदत मिळाली नाही म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या विचार करण्यास भाग पाडणारी आहे. साक्षरता अभियान हे एक राष्ट्रीय कार्य असल्याने त्यात सर्वांचा सहभाग तर आवश्यक आहेच पण नगरसेवकांसारख्या प्रमुख व्यक्तींनी या कार्यात मदत न करणे ही लज्जास्पद गोष्ट आहे. त्या वार्डातील सर्व कुटुंबाची माहिती नगरसेवकांना असणे आवश्यक आहे. त्या वार्डासंबंधी कोणी माहिती विचारल्यानंतर ती देणे व सहकार्य करणे त्याचे कर्तव्य आहे. त्याशिवाय अशा प्रकारचे अभियान राबविणे व यशस्वी करणे कठीण आहे. सोलापूर शहरात साक्षरता अभियानात नगरसेवकांचा अत्यल्प प्रतिसाद आहे, अशा प्रकारची बातमीही दिनांक १४.०९.१९९६ च्या संचार या दैनिकातून प्रसिध्द झालेली आहे.

वार्डप्रमुखाच्या मुलाखतीवरूनही असे कळते की, नगरसेवकांची पाहिजे तेवढी मदत अभियानाकरिता मिळालेली नाही.

## ५.३ निरक्षर सर्व्हेत वार्डातील स्वयंसेवी संघटना / मंडळ यांचे सहकार्य

वार्डातील स्वयंसेवी संघटना व मंडळे आजच्या काळात बहुमूल्य असे सामाजिक कार्य करीत आहेत. आज देशासमोरील अनेक प्रश्न, अपंगाचे प्रश्न, आदिवासीचे प्रश्न, बेघराचे पुनर्वसन, हुंडाविरोध, बालविधवाचे प्रश्न, परितक्त्या स्त्रियांचे प्रश्न अशा अनेक प्रश्नांना हाती घेऊन आपआपल्या परीने कार्य करीत आहेत.

"निरक्षरता" ही तर देशाच्या विकासातील प्रमुख अडसर म्हणून उभी आहे तर या निरक्षरांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी वार्डातील स्वयंसेवी संघटना / मंडळे यांचा कितपत सहभाग मिळाला ते पाहू.

कोष्टक क्रमांक ३

निरक्षर सर्व्हे करताना वार्डातील संघटनांनी व मंडळानी दिलेला सहभाग

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | संघटना व मंडळानी मदत केली | ६१ | ५४.४६ |
| २] | संघटना व मंडळानी मदत केली नाही | ५१ | ४५.५४ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, निरक्षर सर्वेक्षण करताना संघटना व मंडळानी मदत केली असे म्हणणारे प्रतिसादक ५४.४६ टक्के आहेत. तर मदत मिळाली नाही म्हणणारे प्रतिसादक ४५.५४ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की संघटनानी व मंडळानी सर्वेक्षणात मदत केली म्हणणा-यांची संख्या जास्त आहे तरी ४५.५४ टक्के प्रतिसादकाचे म्हणणे मदत मिळाली नाही असे आहे. स्वयंसेवी संघटना / मंडळे यांनी अशा प्रकारच्या अभियानात सहभागी व्हावे . त्यामुळे सर्वत्र त्याचा प्रसार होईल. अभियान राबविताना त्यांच्या बहुमोल सहकार्याची आवश्यकता आहे. तरुण युवक युवतीनी आपल्या बुध्दीचा व शक्तीचा उपयोग अशा निरक्षर समाज बांधवासाठी खर्ची घातल्यास आपण देशाचे थोडेसे ऋण फेडल्यासारखे होईल.

## ५.४ वार्डनिहाय समिती

कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी काही जबाबदार व्यक्तींची निवड करुन त्या प्रतिनिधींची समिती गठीत करुन प्रत्येकाकडे कामे सोपविली जातात व त्यांच्याकडून यशस्वी कामाची अपेक्षा केलेली असते त्यासाठी हे लोक एकत्र येऊन विचारविनिमयाने हे काम यशस्वीरित्या पार पाडण्याचा प्रयत्न करतात व यशस्वी होतात. आपल्या या सोलापूर शहर साक्षरता अभियानातही वार्डनिहाय समिती गठीत करुन त्या समितीकडे त्या वार्डातील साक्षरता वर्गाची जबाबदारी सोपविली होती. त्यामुळे कामावर नियंत्रण व देखरेख करणे सोयीस्कर होते म्हणून निरक्षर सर्वेक्षणाचे काम संपल्यानंतर त्या वार्डातील प्रमुख शाळांनी वार्डनिहाय समिती गठीत करण्याचे आदेश सोलापूर शहर साक्षरता अभियान समितीकडून आलेले होते. जेव्हा संशोधिकेने वार्डनिहाय समिती स्थापन केली होती का ? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा खालील निष्कर्ष दिसून आले.

कोष्टक क्रमांक ४

वार्डनिहाय समितीचे गठण

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वार्डनिहाय समिती गठित केली होती. | ६७ | ५९.८२ |
| २] | वार्डनिहाय समिती गठित केली नाही | ३९ | ३४.८२ |
| ३] | कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले नाही | ०६ | ५.३६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे आढळून येते की, वार्डनिहाय समिती गठित केली होती म्हणणारे प्रतिसादक ५९.८२ टक्के इतके आहेत तर समिती गठित केली नव्हती म्हणणारे प्रतिसादक ३४.८२ टक्के आहेत आणि कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न देणारे प्रतिसादक ५.३६ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की वार्डनिहाय समिती गठित करुन काम करणाऱ्यांची संख्या चांगली आहे पण ज्यांनी ती गठित केली नव्हती त्यानीही समिती तयार करुन काम केले असते तर कामाला आणखी गती आली असती व अडचणी निर्माण होण्याचे प्रमाण कमी झाले असते. पण ५.३६ टक्के प्रतिसादकानी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही त्यावरुन कोणताही निष्कर्ष काढता येत नाही. वार्डसमितीचे अध्यक्ष हे त्या वार्डचे नगरसेवक असल्याने त्यांच्यामार्फत अडचणी सोडविता आल्या असत्या. त्यांच्या कानावर आपण अडचणी घालून त्या सोडविण्यासाठी सहकार्य करण्यास सांगता आले असते. त्याचे ही योगदान या कार्यासाठी आवश्यक आहे याची जाणीव वार्डप्रमुखानी त्यांना देणे महत्त्वाचे आहे.

## ५.५ <u>साक्षरता अभियान जनजागृती</u>

"जनजागृती" याचा अर्थ लोकांमध्ये त्या कार्याविषयीची जाणीव निर्माण करणे. कार्याचे स्वरुप समजल्याशिवाय समाजाचा सहभाग मिळत नाही त्यासाठी जनजागृती आवश्यक असते. कोणतीही मोहिम यशस्वी करावयाची असेल तर त्या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी योग्य त्या वातावरणाची आवश्यकता असते. हीच वातावरणनिर्मिती या संपूर्ण साक्षरता अभियान यशस्वी करण्याची पहिली पायरी होय त्यासाठी खालील बाबींना अग्रस्थान देणे जरुरीचे आहे.

अ] समाजातील प्रत्येक घटकाला अभियानात सहभागी करणे.

ब] साक्षर व्यक्तीला स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करणे .

क] निरक्षरांना साक्षर होण्यासाठी प्रयत्न करणे.

ड] अभियान काळात साक्षर स्वयंसेवक व नवसाक्षर यांचा उत्साह कायम ठेवणे.

साक्षरता अभियानात जनजागृतीसाठी करण्यात आलेले प्रयत्न खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक ५ [अ]

जनजागृतीसाठी वार्डातून दिंडी काढणे

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | विद्यार्थ्यांना घेऊन वार्डातून दिंडी काढली. | ८६ | ७६.७९ |
| २] | वार्डातून दिंडी काढली नाही | २६ | २३.२१ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसते की, शालेय विद्यार्थ्यांना घेऊन वार्डातून साक्षरता दिंडी काढली असे म्हणणारे ७६.७९ टक्के प्रतिसादक आहेत. अशा प्रकारच्या साक्षरता दिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात घोषवाक्ये लिहून दिली होती. विद्यार्थी घोषणा देत होते, त्यावेळी वार्डातील लोक कशासाठी निघालात ? अशा प्रकारचे प्रश्न विचारत होते तेंव्हा त्यांच्या शंकेचे निरसन केले त्याचाही परिणाम जनजागृतीसाठी झाला.

अशा प्रकारची साक्षरता दिंडी न काढणारे प्रतिसादक २३.२१ टक्के आहेत. दिंडी काढणे हे जनजागृतीसाठी व स्फूर्तिदायक वातावरणासाठी आवश्यक होते.

कोष्टक क्रमांक ५ [ब]

जनजागृतीसाठी कलाजथ्थ्याव्दारे कलाकार्यक्रम सादर करणे

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | कलाकार्यक्रम सादर केले | ६९ | ६१.६१ |
| २] | असे कार्यक्रम सादर केले नाहीत. | ४३ | ३८.३९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कलाजथ्थ्याव्दारे कलाकार्यक्रम सादर करणारे प्रतिसादक ६१.६१ टक्के आहेत तर अशा प्रकारचे कार्यक्रम सादर न करणारे प्रतिसादक ३८.३९ टक्के आहेत. असे कार्यक्रम सादर करणा-या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे पण सर्वच वार्डातून असे कार्यक्रम सादर करणे आवश्यक होते. काही तांत्रिक अडचणीमुळे काही वार्डातून कार्यक्रम सादर केले नाहीत असे वार्डप्रमुखाच्या मुलाखतीतून आढळून आले.

अशा प्रकारच्या कलाजथ्थ्याची गरज अशासाठी असते की, नेहमीच्या परिस्थितीपेक्षा वेगळी स्थिती किंवा बदल दिसला की लोकांचे ध्यान आकर्षिले जाते व जिज्ञासेपोटी त्या गोष्टीत थोडे-अधिक लक्ष घालून मानवी स्वभावाप्रमाणे सर्वसाधारण माहिती घेतली जाते. यासाठी या कलापथकाव्दारे साक्षरतेवरील समूह गान, लोकनृत्य, लोकनाटय, पथनाटय, गीतमंचाव्दारे समुदायाला आकृष्ट करणा-या बाबींचे आयोजन सर्वत्र होणे आवश्यक आहे.

## कोष्टक क्रमांक ५ [क]

जनजागृतीसाठी हळदी कुंकवाचे कार्यक्रम सादर करणे

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | हळदी कुंकवाचे कार्यक्रम सादर केले | ६३ | ५६.२५ |
| २] | हळदी कुंकवाचे कार्यक्रम सादर केले नाहीत | ४९ | ४३.७५ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे आढळले की, हळदी कुंकु, पान-सुपारी असे कार्यक्रम करणारे प्रतिसादक ५६.२५ टक्के आहेत तर कार्यक्रम न करणारे ४३.७५ टक्के प्रतिसादक आहेत. कार्यक्रम करणा-यांची संख्या ५० टक्क्याहून जास्त आहे.

तिळगूळ कार्यक्रम, श्रावणी शुक्रवार अशा सणांचे औचित्य साधून निरक्षरांना एकत्रित करुन हळदी-कुंकू कार्यक्रम सादर केला त्याव्दारे निरक्षरांना विश्वासात घेण्यात आले, जवळीकता साधण्याचा प्रयत्न केला गेला त्याचाही परिणाम जनजागृतीकरिता करुन घेता येतो. म्हणून सर्वांनीच अशा प्रकारचे कार्यक्रम घ्यावेत.

## कोष्टक क्रमांक ५ [ड]

जनजागृतीसाठी निरक्षर पालकांच्या भेटी घेणे

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | विद्यार्थ्यांच्या मदतीने निरक्षर पालकांच्या भेटी घेतल्या. | ८४ | ७५.०० |
| २] | पालकांच्या भेटी घेतल्या नाहीत. | २८ | २५.०० |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांच्या मदतीने निरक्षर पालकांच्या भेटी घेतल्या असे म्हणणारे प्रतिसादक ७५ टक्के आहेत तर अशा पध्दतीने भेटी घेतल्या नाहीत असे सांगणारे प्रतिसादक २५ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे समजते की, शिक्षकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहाय्याने निरक्षर पालकांच्या भेटी घेऊन त्यांच्यात साक्षरतेसंबंधी जागृती करण्याचा प्रयत्न केला आहे हे अतिशय चांगले आहे. पंचवीस टक्के प्रतिसादकानी ही अशा पध्दतीने प्रयत्न केले असते तर शाळेतील निरक्षर पालकांना साक्षरता अभियानात सामावून घेऊन त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देता आले असते. निरक्षर पालकांना भेटी देऊन त्याना अभियानात सामावून घेणे हा स्तुत्य असा उपक्रम आहे.

<u>कोष्टक क्रमांक ५ [ड]</u>

जनजागृतीसाठी शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | शिक्षक-पालक मेळावा आयोजित करून साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. | ४३ | ३८.३९ |
| २] | शिक्षक-पालक मेळावा आयोजित केला नाही | ६९ | ६१.६१ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, शिक्षक पालक मेळावा आयोजित करून साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले असे सांगणारे प्रतिसादक ३८.३९ टक्के आहेत तर अशा प्रकारचे मेळावे आयोजित केले नाहीत असे म्हणणारे प्रतिसादक ६१.६१ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, शाळांनीसुध्दा शक्य तेवढया निरक्षरांना एकत्र आणून वेगवेगळया कार्यक्रमाव्दारे साक्षरतेचे महत्त्व पटवून दिलेले आहे पण अशा शाळांचे प्रमाण अत्यल्प आहे ही चिंताजनक बाब आहे. इतरही शाळांनी असे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

वार्डप्रमुखाच्या मुलाखतीवरुन असे स्पष्ट होते की, नगरसेवकांच्या प्रतिसादाबद्दल वार्डप्रमुखही थोडया-फार प्रमाणात नाराज दिसून आले. वातावरण निर्मितीच्या वेळीही अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागले. वार्डातील काही शाळांनी पाहिजे ती माहिती वेळेवर उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे वारंवार जाऊन माहिती घ्यावी लागली. वर्ग व्यवस्था चालू आहेत किंवा नाही याचे निरीक्षण करावे लागले.

५.६ <u>कलाजथ्था निर्मिती</u>

लोककलेच्या माध्यमातून प्रौढशिक्षण प्रसार झपाटयाने होऊ शकतो म्हणून साक्षरता अभियानासारख्या चळवळीत कलाजथ्था तयार ठेवून त्याअंतर्गत कार्यक्रम सादर करणे आवश्यक होते. कारण हे एक अनौपचारिक शिक्षण आहे. कलाजथ्थाव्दारे प्रौढ शिक्षण मोहिमेची पूर्वतयारी आपण करीत असतो. पूर्वतयारी जर सर्वस्पर्शी आणि मजबूत नसेल तर ही मोहीम यशस्वी करणे अवघड होते. या कार्यक्रमात शिकणा-यांच्या गरजा आणि भोवतालच्या परिस्थितीशी निगडीत असे कार्यक्रम होणे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गरजेचे असते. अशी कलाजथ्थानिर्मिती करणा-या प्रतिसादकांची माहिती पुढील कोष्टकांत दिलेली आहे.

कोष्टक क्रमांक ६.

कलाजथ्था निर्मिती केली होती काय.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | कलाजथ्था निर्मिती केली होती. | ७५ | ६६.९६ |
| २] | कलाजथ्था निर्मिती केली नव्हती | ३० | २६.७९ |
| ३] | कोणत्याही प्रकारचे उत्तर न देणारे | ०७ | ६.२५ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, कलाजथ्था निर्मिती केली होती म्हणणारे ६६.९६ टक्के प्रतिसादक आहेत तर कलाजथ्थानिर्मिती केली नव्हती म्हणणारे प्रतिसादक २६.७९ टक्के आहेत आणि कोणत्याही प्रकारचे उत्तर न देणारे प्रतिसादक ६.२५ टक्के इतके आहेत.

वरील विवेचनावरून असे सांगता येते की, कलाजथ्थाव्दारे ६६.९६ टक्के प्रतिसादकांनी मनोरंजनाव्दारे निरक्षरांच्या मनात शिक्षणाविषयी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. जे २६.७९ टक्के प्रतिसादक काही तांत्रिक व आर्थिक अडचणीमुळे असे कार्यक्रम सादर करू शकले नसले तरी ज्ञानप्रबोधिनी शाखेमार्फत कलाजथ्था पथक होते त्यांच्या सहाय्याने वार्डात कार्यक्रम करणे आवश्यक होते. ६.२५ टक्के प्रतिसादकांनी उत्तर न दिल्याने कोणतेही निष्कर्ष काढता येत नाहीत. वार्डप्रमुखानीही काही कलापथके तयार ठेवली होती. त्या पथकाव्दारेही वार्डात प्रमुख अशा ठिकाणी कार्यक्रम सादर केले गेले. त्यांच्यामार्फतही कार्यक्रम करता आले असते. शालेय विद्यार्थ्यांना घेऊन ही हा कार्यक्रम ब-याच शाळांनी राबविलेला आहे.

## ५.७ कलाजथ्था घेऊन वार्डातुन कार्यक्रम सादर करताना आलेल्या अडचणी

शालेय विद्यार्थ्यांनी कलाजथ्था निर्माण केले . त्यात ओवी, अभंग, भजन, कीर्तन, नाटयछटा, गाणी, निरक्षराच्या जीवनातील एखादा अनुभव, समुह गीत, अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे गट तयार करुन वार्डातुन कार्यक्रम सादर करणे थोडेसे कठीणच झाले. कारण असे कार्यक्रम सादर करण्यासाठी रंगमंच स्पिकर, लाईटची व्यवस्था, बैठक व्यवस्था असणे, योग्य प्रकारची जागा असणे आवश्यक असते. त्यासाठी त्या वार्डातील वार्डप्रमुख या नात्याने नगरसेवकांची मदत मिळाली पाहिजे. त्या वार्डातील स्वयंसेवी संस्था व मंडळे यांच्या सहकार्याची गरज भासते. याशिवाय निरक्षराच्या सोयीची वेळ घेऊन त्यांना एकत्र जमविणे बरेच कष्टाचे काम होते. तरी ज्यावेळी शिक्षकांनी कलाजथ्थाव्दारे वार्डातुन कार्यक्रम सादर केले त्यावेळी त्यांना कोणत्या अडचणी आल्या ते पाहू.

कोष्टक क्रमांक ७ [अ]

जागेची आणि विजेची अडचण

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | जागेची व विजेची अडचण प्रामुख्याने भासली | ७३ | ६५.१८ |
| २] | जागेची व विजेची अडचण भासली नाही. | ३९ | ३४.८२ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसते की, जागेची अडचण, विजेची अडचण प्रामुख्याने भासली असे म्हणणारे प्रतिसादक ६५.१८ टक्के आहेत. वरील अडचण आली नाही म्हणणारे प्रतिसादक ३४.८२ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे दिसते की, जागेची अडचण भासलेले प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. कारण वार्डातून कार्यक्रम सादर करताना निरक्षर लोकांना सोयीची होण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण पटकन मिळाले नाही. त्या वार्डातील समाजमंदिराची जागा छोटी होती, तर काही ठिकाणी लाईटची व्यवस्था नव्हती तर काही ठिकाणी स्वच्छतेचा अभाव आढळून आला. ३४.८२ टक्के इतक्या प्रतिसादकाना अडचण भासली नाही. त्या प्रतिसादकानी शाळांमध्ये असे कार्यक्रम सादर केले असावेत असा निष्कर्ष काढता येतो.

<u>कोष्टक क्रमांक ७ [ब]</u>

कार्यक्रमास निरक्षर उपस्थित रहात होते का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | कार्यक्रम पाहण्यासाठी निरक्षर फार मोठया संख्येने उपस्थित राहात नव्हते. | ९७ | ८६.६१ |
| २] | कार्यक्रमास निरक्षर उपस्थित राहात होते. | १५ | १३.३९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कलाजथ्था कार्यक्रम पाहण्यासाठी निरक्षर फार मोठया संख्येने उपस्थित राहात नव्हेते म्हणणारे प्रतिसादक ८६.६१ टक्के आहेत. ही संख्या मोठी आहे तर कार्यक्रमास उपस्थित राहात होते म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या १३.३९ टक्के म्हणजे अत्यल्प आहे.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, निरक्षर नियमित कामाला जात असल्यामुळे घरातील वरीष्ठ लोकांच्या विरोधामुळे लहान मुले अशा अनेक कारणामुळे निरक्षर उपस्थित राहण्यास टाळाटाळ करतात त्यामुळे वातावरण निर्मितीस लागणारा काळ वाढला. त्याना कार्यक्रमादिवशी पुन्हा सांगून आले असता उपस्थितीत थोडीसी वाढ झालेली दिसून आली. कार्यक्रमास निरक्षर उपस्थित होते म्हणणारे प्रतिसादक अत्यल्प आहेत.

तरीही या प्रकारच्या कार्यक्रमाचा परिणाम वातावरणनिर्मितीसाठी झालेला आहे.

## ५.८ वातावरण निर्मितीसाठी केलेल्या कार्यक्रमांना निरक्षरांचा प्रतिसाद

कोणत्याही मोठ्या प्रमाणावर एखादे कार्य हाती घ्यावयाचे तर त्यासंबंधी लोकांना त्याची माहिती असणे आवश्यक आहे. त्या कार्यासाठी जनमत जागे होणे गरजेचे असते. त्यासाठी विविध प्रसिध्दी माध्यमांचा वापर करावा लागतो. उदाहरण द्यावयाचे तर निवडणूका घ्यावयाच्या ठरविल्यानंतर कोण व्यक्ती कोणत्या पक्षासाठी उभी आहे ते सर्वत्र स्पिकरवरुन सांगण्यात येते. कॉर्नर बैठका घेण्यात येतात, जाहीर व्याख्याने घेण्यात येऊन पोस्टर्स चिकटविण्यात येतात त्यांचे चिन्ह सर्वत्र लावले जाते तेंव्हा कुठे सर्वजण त्याविषयी चर्चा करतात. त्याप्रमाणे साक्षरता अभियानासारखी चळवळ हाती घेतल्यानंतर सर्वच वातावरण साक्षरतामय होणे आवश्यक होते पण फारसे साध्य झाले नाही. तरी दुरदर्शनच्या, आकाशवाणीच्या माध्यमातून हे काम फार मोठ्या प्रमाणात केलेले आहे.

कोष्टक क्रमांक ८.

वातावरणनिर्मितीसाठी केलेल्या कार्यक्रमास लोकांचा
उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १] | उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला | ८३ | ७४.११ |
| २] | उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला नाही | २८ | २५.०० |
| ३] | कोणतेही उत्तर मिळाले नाही. | ०१ | ०.८९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, वातावरणनिर्मितीसाठी केलेल्या कार्यक्रमास निरक्षराचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असे म्हणणारे प्रतिसादक ७४.११ टक्के आहेत यावरुन असे म्हणता येते की मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून का होईना लोकांचा प्रतिसाद कार्यक्रमास मिळाला. मनोरंजनाच्या माध्यमातून निरक्षरांना निरक्षतेमुळे होणारे नुकसान, शिक्षणाचे महत्त्व समजू लागले. अशा कार्यक्रमाना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला नाही असे म्हणणारे प्रतिसादक २५ टक्के आहेत, हे प्रमाण कमी असले तरी प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. तर ०.८९ टक्के प्रतिसादकाने कोणतेच उत्तर दिले नाही त्यामुळे त्या प्रतिसादकांनी कार्यक्रम सादर केलेले आहेत किंवा नाही यापैकी काहीच सांगता येत नाही.

## ५.९ प्रशिक्षण कालावधी

साक्षरता अभियानांतर्गत शिक्षकाना दिलेल्या प्रशिक्षणाच्या कालावधी संबंधी माहिती या उपघटकात घेतलेली आहे. सोलापूर शहरात साक्षरता

अभियान राबविण्यासाठी म्हणजे सुमारे चार लक्ष निरक्षरांसाठी चाळीस हजार शिक्षकांची गरज होती. प्रत्येक स्वयंसेवक हा दहा निरक्षरांना साक्षर करील. चाळीस हजार शिक्षक, दोन हजार प्रशिक्षक [शिक्षकांचे शिक्षक] आणि १०० मार्गदर्शक [प्रशिक्षकांचे शिक्षक] व दहा अध्वर्यु [मार्गदर्शक प्रमुख] अशी रचना आहेली

एक शिक्षक दहा जणांना शिकवेल असे त्याचे प्राथमिक सूत्र आहे. या शिक्षकांना निरक्षरांना शिकविण्यासाठी नेहमीची अध्यापन पध्दती वापरुन चालणार नव्हती तर ते प्रौढ असल्याने व आपल्यापेक्षाही व्यवहारात कुशल असल्याने त्यांच्यासाठी वेगळी व आदरयुक्त पध्दतीने शिकविण्याची गरज होती. त्याकरिता शिक्षकांना साक्षरता अभियान भाग-१ करिता तीन दिवसाचे, साक्षरता अभियान भाग २ करिता तीन दिवसाचे व भाग तीन करिता दोन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले. संशोधिकेने संशोधन करताना या प्रशिक्षण कालावधीचाही विचार केलेला आहे.

कोष्टक क्रमांक ९.

शिक्षकांना दिलेला प्रशिक्षण कालावधी पुरेसा होता काय.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | प्रशिक्षण कालावधी पुरेसा होता | ८० | ७१.४३ |
| २] | प्रशिक्षण कालावधी पुरेसा नव्हता | ३० | २६.७९ |
| ३] | कोणताही प्रतिसाद नाही | ०२ | १.७८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, प्रशिक्षण कालावधी पुरेसा होता म्हणणारे प्रतिसादक ७१.४३ टक्के आहेत तर कालावधी अपुरा होता म्हणणारे प्रतिसादक २६.७९ टक्के आहेत तर प्रतिसाद न देणारे १.७८ टक्के आहेत. यावरुन असे सांगता येते की, कालावधी पुरेसा होता म्हणणारे प्रतिसादक मोठया प्रमाणावर आहेत. कारण शिक्षक दैनंदिन अध्यापनाचे कार्य करीत असल्याने प्रशिक्षण कालावधी दीर्घ ठेवण्याचे कारण नव्हते. त्यामुळे शाळेच्या दैनंदिन कामकाजावरही परिणाम झाला असता व प्रशिक्षण कालावधी जास्त ठेवल्याने अभियान समितीवर आर्थिक बोजाही पडला असता म्हणून प्रशिक्षण कालावधी हा पुरेसा होता.

प्रशिक्षण कालावधी पुरेसा नव्हता म्हणणारे अत्यल्प प्रतिसादक आहेत. त्यांच्या दृष्टिकोनातून हे प्रशिक्षण अपुरे वाटलेले आहे. तर १.७८ टक्के प्रतिसादकांनी साक्षरता अभियान प्रशिक्षण कालावधीसंबंधी कोणताही अभिप्राय दिलेला नाही ही चिंताजनक बाब आहे.

प्रशिक्षण कालावधी योग्य होता असे सर्वच मुलाखतकारांनी सांगितलेले आहे. जेंव्हा संशोधिकेने साक्षरता वर्गाचे निरीक्षण केले तेंव्हा वर्ग घेणा-या सर्वांचे प्रशिक्षण झालेले होते.

## ५.१० जेवणाची सोय

प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण हे सकाळी ९ ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत असल्याने शिक्षकांना जेवणाची सोय प्रशिक्षण स्थळावर करण्यात आली होती का असा प्रश्न विचारण्यात आला होता तर त्यासंबंधीची प्रतिसादकांची मते पाहू या.

## कोष्टक क्रमांक १०

### प्रशिक्षणात जेवणाची सोय केली होती का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | जेवणाची सोय केली होती | ७२ | ६४.२९ |
| २] | जेवणाची सोय केली नव्हती | ३७ | ३३.०४ |
| ३] | प्रतिसाद नाही | ०३ | २.६७ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, प्रशिक्षण स्थळावर जेवणाची सोय होती म्हणणारे प्रतिसादक ६४.२९ टक्के आहेत तर सोय केलेली नव्हती म्हणणारे प्रतिसादक ३३.०४ टक्के असून जेवणाची सोय होती किंवा नव्हती यासंबंधी २.६७ टक्के प्रतिसादकांनी कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नाही.

जेवणाची सोय जिथे केलेली नव्हती तिथे नाष्टयाची सोय बहुधा करण्यात आलेली असावी. विभागस्तरावर आर्थिक अनुदान दिलेले होते पण जिथे अशी सोय केलेली नव्हती तिथे जेवणाची व्यवस्था करणे आवश्यक होते.

### ५.११ प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहण्यासंबंधी शाळेतून मिळालेल्या सवलती

प्रशिक्षणाचा कालावधी हा शालेय कामकाजाच्या कालावधीत असल्याने काही अडचणी या प्रशिक्षणासाठी जाताना आल्या. काही ठिकाणी शिक्षकांची संख्या कमी असल्याने शाळांना सुट्टी देण्यात आली तर काही ठिकाणी शिक्षक संख्या जास्त होती तेथे वर्ग एकत्र करुन शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. संशोधिकेने जेव्हा प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहण्यासंबंधी शाळेतून

सवलत मिळाली का यासंबंधी शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा खालील प्रमाणे माहिती उपलब्ध झाली.

कोष्टक क्रमांक ११

प्रशिक्षणास जाण्यासाठी शाळेतून सवलत मिळाली का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | सवलत मिळाली | ९० | ८०.३६ |
| २] | सवलत मिळाली नाही. | २२ | १९.६४ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे आढळून येते की, साक्षरता अभियान प्रशिक्षणास जाण्यासाठी शाळेतून सवलत मिळाली असे सांगणारे प्रतिसादक ८०.३६ टक्के आहेत तर अशा प्रकारची सवलत मिळाली नाही म्हणणारे प्रतिसादक १९.६४ टक्के आहेत. हे प्रमाण कमी आहे तरी विचार करण्यास भाग पाडणारे आहे. कारण साक्षरता अभियान ही एक राष्ट्रीय योजना आहे. तर अशा महान कार्यात भाग घेण्यासाठी जर शाळांनी शिक्षकांना सहकार्य केले नाही तर हे कार्य कोणी करावयाचे हा प्रश्न उभा राहतो. कांही तांत्रिक अडचणीमुळे शाळांनी जर १९.६४ टक्के शिक्षकांना सवलत दिली नसेल तरीही ते चुकीचे आहे. त्या अडचणीवर मात करुन अशा राष्ट्रीय कामात शिक्षकांना सहभागी होण्यास शाळांनी प्रोत्साहनच द्यावे असे संशोधिकेस वाटते.

## ५.१२ साक्षरता अभियानात काम करण्यासाठी शाळेतून मिळालेले सहकार्य

साक्षरता अभियानात प्रत्यक्ष कार्य करतानाही अनेक अडचणींना शिक्षकांना सामोरे जावे लागलेले आहे. हे एक राष्ट्रीय कार्य म्हणून सहभागी झाल्यानंतर या अभियानासंबंधी जेव्हा जेव्हा बैठका व्हायच्या तेव्हा माहिती घेऊन त्या बैठकांना उपस्थित रहावे लागे, किंवा निरक्षर वर्गात येण्यासंबंधी काही अडचणी असल्यास जावे लागे अशा वेळी शाळेतून शिक्षकांना कितपत सहकार्य मिळाले ते पाहू या.

कोष्टक क्रमांक १२

साक्षरता अभियानात काम करण्यासाठी शाळेतून सहकार्य मिळाले का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | सहकार्य मिळाले | ९७ | ८६.६१ |
| २] | सहकार्य मिळाले नाही | ०६ | ५.३६ |
| ३] | कोणताही प्रतिसाद नाही | ०९ | ८.०३ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे म्हणता येईल की, साक्षरता अभियानात काम करण्यासाठी शाळेतून सहकार्य मिळाले असे म्हणणारे प्रतिसादक ८६.६१ टक्के आहेत तर शाळेतून सहकार्य मिळाले नाही असे उत्तर देणारे प्रतिसादक ५.३६ टक्के आहेत आणि यासंबंधी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न करणारे प्रतिसादक ८.३ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे सांगता येईल की, ८६.६१ टक्के प्रतिसादकांना शाळेतून या कामासाठी उत्तम सहकार्य मिळालेले आहे तर ५.३६ टक्के शिक्षकांना सहकार्य मिळालेले नाही. त्यांना देखील शाळेतून सहकार्य शाळाप्रमुखांनी द्यावे तसेच सहकार्य मिळाले किंवा नाही हे न सांगणारे प्रतिसादकानी कांहीही ठामपणे सांगितलेले नाही पण त्यानीही निर्भिडपणे आपले मत व्यक्त केले असते तर निर्णय देणे योग्य झाले असते. पण ज्या शाळांनी सहकार्य केले आहे त्या शाळा सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतात असे म्हणता येईल.

## ५.१३ साक्षरता अभियानातील शिक्षकांचा सहभाग

साक्षरता अभियान हे एक राष्ट्रीय कार्य असल्याने शिक्षकांनी ते काम स्वेच्छेने स्वीकारणे गरजेचे आहे. स्वेच्छेने कोणतेही कार्य केल्यास त्या कामाचा बोजा वाटत नाही त्यात जरी अडचणी आल्या तरी त्या सोडविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न कार्य करणा-या व्यक्तिकडून होतो. तर आपल्या या साक्षरता अभियानात जरी प्राथमिक शिक्षकांना हे काम सोपविण्यात आले होते तरी ब-याच जणांनी स्वच्छेनेही काम केलेले आढळून आले आहे त्यामुळे त्यांची संख्या पाहू या.

### कोष्टक क्रमांक १३

आपण साक्षरता अभियानात स्वेच्छेने भाग घेतला आहे काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | स्वेच्छेने सहभागी झालेले शिक्षक | ९४ | ८३.९३ |
| २] | काम दिलेले आहे म्हणून पार पाडणारे | १४ | १२.५० |
| ३] | प्रतिसाद न देणारे | ०४ | ३.५७ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, साक्षरता अभियानात स्वेच्छेने सहभागी झालेल्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ८३.९३ इतके आहे तर स्वेच्छेने सहभाग नसणा-यांची संख्या १२.५० टक्के इतकी आहे. कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न देणारे प्रतिसादक ३.५७ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे आढळून येते, स्वेच्छेने साक्षरता अभियानात सहभागी होणा-यांची संख्या जास्त असून अतिशय कौतुकास्पद आहे. यासारख्या अभियानात काम करण्यासाठी अशाच मनुष्यबळाची गरज आहे. इच्छा नसतानाही सहभागी होणारे १२.५० टक्के प्रतिसादक आहेत तर काही अडचणीमुळे हे इच्छुक नसतील पण यासारखे महान कार्य नाही तरीही हे लोक कार्य करत आहेत. प्रतिसाद न देणा-यांना होय म्हणावे की नाही या संभ्रमात पडल्याने कदाचित कोणतेही उत्तर दिलेले नसावे.

जेव्हा वार्डप्रमुखाची व तज्ञ मार्गदर्शकांची मुलाखत घेण्यात आली तेव्हा त्यानीही वार्डप्रमुखाची जबाबदारी स्वच्छेने स्वीकारलेली आहे असे सांगितले. स्वेच्छेने केलेले कोणतेही कार्य यशस्वी होते त्यात अडचणी आल्या तरी त्या सोडविताना त्रास वाटत नाही.

## ५.१४ साक्षरता अभियानात निवडलेल्या निरक्षरांची संख्या

सोलापूर शहरात प्राथमिक शिक्षकांनी जनगणनेप्रमाणे घरोघरी जाऊन संपर्क साधण्याचा प्रयत्न करुन निरक्षर व्यक्तींचा सर्व्हे पूर्ण केला. या आधारे सोलापूर शहरात चाळीस हजार निरक्षर आढळून आले. सोलापूर शहराचे साक्षरता अभियान कार्यात सुसूत्रता आणण्याकरिता दहा विभागात विभागणी

करण्यात आली. वार्ड क्रमांक एक ते नऊ चा पहिला विभाग असून या विभागात निरक्षरांची संख्या ३८५२ आहे. वार्ड क्रमांक दहा ते सतरा या दुस-या विभागात निरक्षर संख्या १५९३ असून तिसरा विभाग वार्ड क्रमांक अठरा ते सव्वीसचा असून या वार्डातील निरक्षरांची संख्या ३९९२ आहे.

एकूण या तीनही विभागात मिळून ९१६७ इतकी निरक्षर संख्या आहे. संशोधिकेने संशोधनासाठी पहिले तीन विभाग निवडलेले आहेत. संशोधिकेने सर्व्हे केलेल्या तीन विभागात साक्षरता अभियानाचे वर्ग चालविणारे शिक्षक ११२ असून त्यानी ३१४० निरक्षरांची अभियानासाठी निवड करून साक्षरता वर्ग चालविले आहेत. तीन विभागातील राहिलेल्या निरक्षरांचे वर्ग सुशिक्षित बेकार तरूण, युवक मंडळे, महिलामंडळे, स्वयंसेवी संघटना, स्वयंसेवक यांच्यामार्फत चालविले जातात.

## ५. १५ साक्षरता वर्गाचे ठिकाण

साक्षरता वर्ग चालविण्यासाठी ठिकाणाची निवड करताना निरक्षरांना सोयीचे होईल जाण्या-येण्याचा फारसा त्रास होणार नाही अशाच स्थळांची निरक्षरांच्या म्हणण्यानुसार निवड करण्यात आली त्यामुळे ते नियमित वर्गात उपस्थित राहू शकतील ही एक आशा होती. याशिवाय या वयात शिकायला जातो हे सांगणेही काही जणांना लज्जास्पद वाटे. काही लोकांच्या घरातून शिकण्यास जाण्यास विरोध होता. तशाकडे स्वत: शिक्षिका त्याच्या घरी जाऊन शिकवत, असे अनेक प्रकार स्थळ निवडतानाही अनुभवास आले.

साक्षरता वर्गासाठी प्रतिसादकांनी स्थळाची निवड कशी केली ते कोष्टकाद्दारे पाहू.

कोष्टक क्रमांक १४

साक्षरता वर्ग कोठे होता.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | शाळा | ४० | ३५.७१ |
| २] | घर | ५० | ४४.६४ |
| ३] | समाजमंदिर | २० | १७.८६ |
| ४] | पार | - | - |
| ५] | पडवी | ०२ | १.७९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, साक्षरता वर्गासाठी शाळेची निवड करणारे प्रतिसादक ३५.७१ टक्के आहेत. तर घरात वर्ग घेणारे प्रतिसादक ४४.६४ टक्के आहेत. समाज मंदिरात १७.८६ टक्के प्रतिसादक साक्षरता वर्ग घेतात. पडवीत वर्ग घेणारे प्रतिसादक १.७९ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे म्हणता येते, शाळेत सर्व सुविधा असल्याने ३५.७१ टक्के प्रतिसादक साक्षरता वर्ग शाळेत घेतात. घर हे निरक्षरांना येण्याजाण्यास सोईचे, सुरक्षित वाटत असल्याने ४४.६४ टक्के लोक साक्षरता वर्ग निरक्षरांच्या घरी तर काही वर्ग शिक्षकांच्या घरी चालविले जातात. समाज मंदिरात वर्ग घेणा-यांचे प्रमाण कमी आहे आणि पडवीत वर्ग घेणा-यांचे प्रमाण अत्यल्प आहे.

जेंव्हा संशोधिकेने साक्षरता वर्गाचे निरीक्षण केले तेव्हा बहुतेक वर्गाच्या ठिकाणी सोयी दिसून आल्या. काही ठिकाणी क्रिडांगणाची सोय नव्हती.

कांही ठिकाणी विजेची तात्पुरती सोय केलेली होती. वर्गासाठी आवश्यक त्या सोयी होत्या.

५.१६ साक्षरता वर्गाची वेळ

साक्षरता वर्गाची वेळ ठरविताना निरक्षरांच्या सोयीची वेळ निवडणे फार महत्वाचे होते. निरक्षरता हीच मुळात अज्ञान, अंधश्रध्दा व आर्थिक कारणामुळे आलेली आहे. या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी हे निरक्षर कामासाठी दिवसभर बाहेर जातात त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना नियमित वेळेवर उपस्थित राहण्यास सांगणे कठीण होते जेव्हा त्यांना त्यांच्या सोईची वेळ देणार असे सांगण्यात आले तेव्हा वर्गात उपस्थित राहण्यास तयार झाले.

कोष्टक क्रमांक १५

साक्षरता वर्गाची वेळ कोणती

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | सकाळ | - | - |
| २] | दुपार | २० | १७.८६ |
| ३] | संध्याकाळ | ९० | ८०.३६ |
| ४] | जमेल तसे घेतले | ०२ | ०१.७८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे म्हणता येईल की, एकही प्रतिसादक सकाळी वर्ग घेत नाहीत. बहुतेक सकाळच्या वेळी स्त्रियांना घरची कामे असतात हे

कारण असू शकेल. दुपारी वर्ग घेणारे प्रतिसादक १७.८६ टक्के आहेत हे प्रमाणही कमीच आहे कारण बहुतेक शिक्षकांची शाळेची वेळ दुपारची असल्याने हे प्रमाण कमी आहे. संध्याकाळी वर्ग घेणारे प्रतिसादक ८०.३६ टक्के आहेत हे प्रमाण बरेच आहे त्याचे कारण शिक्षकांनाही शाळा सुटल्यानंतर वेळ मिळतो व निरक्षरही कामावरुन येतात त्यामुळे त्यानाही वेळ सोईची ठरते म्हणून मोठ्या प्रमाणावर वर्ग संध्याकाळी चालविले जातात. जमेल त्या वेळी वर्ग घेणारे प्रतिसादक फक्त १.७८ टक्के आहेत हे प्रमाण अत्यल्प आहे.

संशोधिकेने जेवढया वर्गाचे निरीक्षण केले त्या सर्व वर्गाची वेळ संध्याकाळची होती.

### ५.१७ निरक्षरांची नियमित वर्गात उपस्थिती

निरक्षराच्या सोयीचे स्थळ, वेळ निवडल्यानंतर त्यांची वर्गात नियमित उपस्थिती असणे आवश्यक आहे. तरी त्यांच्या नियमित उपस्थितीसंबंधी संशोधिकेने जेव्हा माहिती मिळवली तेव्हा खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

कोष्टक क्रमांक १६

निरक्षर नियमित वर्गात उपस्थित राहतात काय .

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | नियमित उपस्थित राहतात. | ४३ | ३८.३९ |
| २] | नियमित उपस्थित राहत नाहीत | ६९ | ६१.६१ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, निरक्षर नियमित वर्गास उपस्थित राहतात म्हणणारे प्रतिसादक ३८.३९ टक्के आहेत तर निरक्षर नियमित वर्गास उपस्थित नसतात म्हणणारे प्रतिसादक ६१.६१ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे समजते की, नियमित वर्गास उपस्थित रहाणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. अजूनही निरक्षरांच्या मनात शिक्षणाविषयी आस्था नाही. अज्ञान व आर्थिक विवंचनेमुळे ग्रासलेले असल्याने त्यांना शिक्षणापेक्षा उदरनिर्वाहासाठी कष्ट करणे गरजेचे वाटते. त्यासाठी अगोदर शासनाने त्यांच्या अडचणी सोडवाव्यात त्याना विश्वासात घ्यावे. त्यांच्या गरजाशी निगडीत असे शिक्षण द्यावे त्यातून त्यांची दैन्यावस्था दूर करण्याचा प्रयत्न व्हावा तरच निरक्षर वर्गात नियमित येऊ शकतील. नियमित उपस्थित राहण्याचे प्रमाणही फारसे समाधानकारक नाही त्यामुळे ही चिंताजनक बाब आहे. निरक्षर वर्गात नियमित उपस्थित राहत नसतील तर हे कार्य यशस्वी होणे कष्टप्रद आहे. त्यासाठी नियमित उपस्थित राहणाऱ्याचे कौतुक करावे. त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवले की ते नियमित उपस्थित राहतात.

त्यांच्या काही वैयक्तिक अडचणी असतील तर त्या आपल्या परीने शिक्षकांनी सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ५.१८ निरक्षर वेळेवर वर्गात उपस्थित राहण्यासंबंधी

निरक्षर नियमित वर्गात उपस्थित राहणे जेवढे महत्त्वाचे तेवढेच वेळेवर उपस्थित राहणेही महत्त्वाची बाब आहे. पण कामाच्या वेळेच्या बंधनामुळे संध्याकाळच्या घरकामामुळे, दूरदर्शनवरील एखाद्या चांगल्या

कार्यक्रमामुळे, अचानक कोणी घरी आल्याकारणाने, आजारपणामुळे अशा अनेक कारणामुळे निरक्षर वेळेवर वर्गास उपस्थित राहत नाहीत असे दिसते पण ज्यावेळेस यासंबंधी माहिती मिळाली ती खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक १७

निरक्षर वेळेवर साक्षरता वर्गास येतात काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वेळेवर उपस्थित राहतात. | ४५ | ४०.१८ |
| २] | वेळेवर उपस्थित राहत नाहीत | ६५ | ५०.०४ |
| ३] | कोणताही प्रतिसाद नाही | ०२ | १.७८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, निरक्षर वेळेवर वर्गात उपस्थित राहतात म्हणणारे प्रतिसादक ४०.१८ टक्के आहेत आणि वेळेवर उपस्थित राहत नाहीत म्हणणारे प्रतिसादक ५०.०४ टक्के आहेत. काहीही प्रतिसाद न देणारे प्रतिसादक १.७८ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे समजते की, वेळेवर उपस्थित न राहिल्याने अभ्यासक्रम नीट समजत नाही. झालेला अभ्यास पुन्हा द्यावा लागतो त्यामुळे वेळेत अभ्यासक्रम पूर्ण होत नाही. अभ्यासाचा भाग न समजल्याने निरक्षर कंटाळतात. या वयात जमत नाही म्हणून वर्गास येणेच सोडून देतात. निरक्षर वेळेवर वर्गात येत नसल्याने शिक्षकांना जास्त वेळ थांबावे लागते त्याना घरी जाण्यास उशीर होतो त्यामुळे निरक्षर वेळेवर वर्गात आल्यास सर्वांचाच त्रास वाचतो.

५.१९ निरक्षरांची स्वेच्छेने उपस्थिती

निरक्षर स्वेच्छेने साक्षरता वर्गास येतात काय ? या संबंधी विचार केला असता प्रत्यक्ष पाहणीनंतर असे आढळून आले.

कोष्टक क्रमांक १८

निरक्षर साक्षरता वर्गासाठी स्वेच्छेने येतात काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | स्वेच्छेने वर्गास येतात | ४५ | ४०.१८ |
| २] | स्वेच्छेने वर्गास येत नाहीत | ६२ | ५५.३६ |
| ३] | कोणताही प्रतिसाद नाही | ०५ | ४.४६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, निरक्षर स्वेच्छेने वर्गास येतात असे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ४०.१८ टक्के आहे. तर स्वेच्छेने वर्गास उपस्थित राहत नाहीत म्हणणारे प्रतिसादक ५५.३६ टक्के आहेत हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे. कोणत्याही प्रकारचे उत्तर न देणारे ४.४६ टक्के प्रतिसादक आहेत.

वरील विवेचनावरून असे सांगता येते की, निरक्षर स्वेच्छेने उपस्थित राहतात ही आनंद देणारी गोष्ट आहे. स्वेच्छेने उपस्थित राहिले तर शिकविणाऱ्यालाही उत्साह येतो त्यामुळे त्यांचे शिकणे देखील आनंददायी होते त्यामुळे शिकण्यात कंटाळा येत नाही. परंतु असे वेळेवर येणारे लोक कमी आहेत, ते म्हणतात लहानपणी आम्हाला शिकता आले नाही आता सरकारने

ती योजना काढली आहे तर शिकावे. याविरुध्द ५५.३६ टक्के लोक आहेत त्यांना वारंवार वर्गात उपस्थित राहण्यासंबंधी सूचना द्यावी लागते, कधी कधी बोलावून आणावे लागते. अजूनही या लोकांमध्ये शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही समज आलेली नाही. कोणतेही उत्तर न दिल्याने ४.४६ टक्के प्रतिसादकांचा कोणताही निर्णय देता येत नाही.

निरक्षर लोकांनी नियमित वेळेवर वर्गास उपस्थित राहिले तर साक्षर होण्याकरीता कमी कालावधी लागणार आहे. त्यामुळे त्याचा विकास होणार आहे. निरीक्षणावरुन असे दिसून आले की निरक्षर नियमित व वेळेवर उपस्थित राहात नाहीत. सणासुदीच्या काळात तर वर्गातील प्रौढांची संख्या रोडावलेली दिसून आली.

## ५.२० निरक्षरांना शिकण्यात आनंद वाटावा म्हणून केलेले प्रयत्न

निरक्षर प्रौढ जरी आपल्या आर्थिक विवंचनेमुळे किंवा इतर कोणत्याही कारणानी त्रस्त झालेले असतील तरी त्याना त्यातून थोडातरी विसावा या साक्षरता वर्गात उपस्थित राहिल्यानंतर मिळावा ते वर्गात आल्यावर आपले दु:ख विसरुन अभ्यासात समरस व्हावेत यासाठी प्रौढ साक्षरता वर्ग चालविणा-या शिक्षकांनी बरेच प्रयत्न केलेले आहेत. असे कोणते प्रयत्न केलेले आहेत ते प्रश्नावलीत विचारले असता खालील प्रमाणे प्रयत्न केल्याचे दिसून आले.

१] प्रथम निरक्षरांना आलेल्या अडचणी समजून घेतल्या. अज्ञानामुळे त्यांच्यावर कसा नकळत अन्याय होतो हे समजावून दिले असे सांगणा-या प्रतिसादकाचे प्रमाण ५१.५२ टक्के आहे.

२] साक्षरता वर्गात कौटुंबिक वातावरण तयार केले त्यामुळे त्यांना वर्गात येण्यास संकोच वाटेनासा झाला असे सांगणारे प्रतिसादक ५४ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४८.२१ आहे.

३] शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षणामुळे अनुभव कसे वाढतात ते सांगितले असे सांगणारे प्रतिसादक ७९ असून त्यांचे शेकडा प्रमाण ७०.५३ टक्के आहे.

४] आरोग्यविषयक माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, परिसरासंबंधी माहिती मिळणा-या सुविधा यांची माहिती त्यांना सांगितली असे सांगणारे प्रतिसादक ४० असून त्यांचे शेकडा प्रमाण ३५.७१ आहे.

५] त्यांच्या नित्यअनुभवाचे आधारे त्यांच्या दैनंदिन गरजांचा विचार करुन शिकविले असे सांगणारे प्रतिसादक ३३ असून त्यांचे प्रमाण २९.४६ टक्के आहे.

६] गाणी, गोष्टी, नकला, ओव्या, कथाकथन याव्दारे निरक्षरांची होणारी फसवणूक कशी होते हे सांगण्यात आले व मनोरंजनातून होणारे अन्याय त्यांना सांगितले असा प्रतिसाद देणारे प्रतिसादक ६८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६०.७१ टक्के आहे.

७] रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आला. त्या स्पर्धा आयोजित करुन बक्षीस देण्यात आले अशा स्पर्धांमुळे प्रौढांचा आत्मविश्वास वाढला. त्यांना नियमित वर्गात येण्यासाठी यामुळे प्रोत्साहन मिळाले, असे सांगणारे प्रतिसादक ८५ असून त्यांचे शेकडा प्रमाण ७५.८९ टक्के आहे. हे प्रमाण खूपच चांगले आहे. त्यामुळे प्रौढांच्या उपजत गुणाचा शोध घेण्यात आला

व त्यांना त्याव्दारे आर्थिक समस्या सोडविण्याचा प्रयत्नही केला गेला. शिवणक्लास संबंधी इतर काही उदरनिर्वाहाची छोटी-मोठी कामे यांची माहिती त्यांना देण्यात आली.

८] साक्षरता वर्गाचे वातावरणही जास्तीत जास्त आनंददायी ठेवण्याचा प्रयत्न केला. एकमेकांशी सुसंवाद साधणे, निरक्षरांच्या काही अडचणी असतील तर त्यांच्यातीलच इतर प्रौढांच्या सहाय्याने शक्य नसल्यास स्वत: शिक्षकांनी त्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे असे वर्ग निरीक्षणाच्या वेळी दिसून आले.

९] सोलापूर शहर साक्षरता अभियान समितीकडून मिळालेले अक्षर सुगंध भाग १ यातील गाणी देखील आनंददायी वातावरण तयार करण्यासाठी चांगली आहेत तीही वर्गात घेण्यात आली.

१०] काही प्रौढ हे स्वयंसेवकापेक्षा वयाने मोठे असल्याने त्यांच्याशी वागताना नेहमी आदरयुक्त वागणूक दिली त्यामुळे त्यांनाही आपण निरक्षर असल्याने आपणास कोण महत्त्व देत नाही असे वाटले नाही असे सांगणारे प्रतिसादक १० असून त्यांचे शेकडा प्रमाण ८.९३ टक्के आहे.

११] विविध तज्ञ व्यक्तींची व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे घडवून आणले त्याव्दारा ज्ञान मदत मार्गदर्शन उपलब्ध करून दिले.

अशा अनेक प्रकारे साक्षरता वर्गाचे वातावरण आनंददायी व शिकण्यास प्रेरणा देणारे असे ठेवण्यात आले. जास्तीतजास्त निरक्षरांना साक्षरता वर्गाची ओढ लागावी, नकळत त्यांचे पाय साक्षरता वर्गाकडे वळावेत असे वातावरण निर्माण केले.

## ५.२१ साक्षरता अभियान समितीकडून मिळालेल्या शैक्षणिक साहित्यासंबंधी

राज्य प्रौढशिक्षण संस्था यांच्याव्दारा नवसाक्षरांना साक्षर करण्याकरिता आपले शिक्षण भाग १, भाग २ व भाग ३ ही पुस्तके, पाटी पेन्सील हे शैक्षणिक साहित्य मोफत उपलब्ध करून दिले गेले. हे शैक्षणिक पाठ्यक्रम अशा प्रकारे तयार करण्यात आलेला आहे की, २०० तासाच्या शिक्षणाव्दारे एका नवसाक्षराला साक्षरता या क्षेत्रात स्वावलंबी करता येते. याशिवाय स्वयंसेवकांसाठी साक्षरता स्वयंसेवक मार्गदर्शिका गुंडाळी फळा, खडू, हजेरीपुस्तिका पुरविले गेले. हे सर्व शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध झाले का यासंबंधी माहिती मिळवली असता खालील माहिती मिळाली.

कोष्टक क्रमांक ११

सर्व शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध झाले का..

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | साहित्य वेळेवर उपलब्ध झाले | ९१ | ८१.२५ |
| २] | साहित्य वेळेवर उपलब्ध झाले नाही | २१ | १८.७५ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, साक्षरता अभियान समितीकडून शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध झाले म्हणणारे प्रतिसादक ८१.२५ टक्के आहेत. हे प्रमाण चांगले आहे. वेळेवर साहित्य उपलब्ध झाले नाही म्हणणारे प्रतिसादक १८.७५ टक्के आहेत हे प्रमाण अत्यल्प आहे.

वरील विवेचनावरुन असे म्हणता येते की, सर्व विभागातून शैक्षणिक साहित्य वेळेवर मिळालेले आहे व ते निरक्षरांनाही दिले गेले आहे ही एक आनंददायी गोष्ट आहे. शैक्षणिक साहित्याशिवाय कोणतेही पुढील पाऊल उचलताच आले नसते यावरुन असे म्हणता येते की जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. घर, समाजमंदिर येथे वर्ग घेणा-यांना फलकाची आवश्यकता असते म्हणून त्यांच्याकरिता गुंडाळी फळे देण्यात आले होते. निरक्षरांची नियमित हजेरी भरण्याकरिता हजेरी पुस्तके देण्यांत आली होती.

ज्यांना शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध झाले नाही त्याचे कारण शाळा प्रमुख शाळापासून दूर अंतरावर अस असल्याने किंवा साहित्य मागणी चुकीची झाल्याने, आणून देणारे नसल्याने अशा किरकोळ कारणामुळे या १८.७५ टक्के लोकांना शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध झाले नसावे. अशी कारणे बहुधा होऊ नयेत म्हणून सर्वांनी प्रयत्न करावेत.

साक्षरता अभियानात साक्षरता अभियान समितीकडून सर्व साहित्य वेळेवर मिळाले व वाटप सर्वत्र झाले असेच मुलाखतीवरुन समजते व निरीक्षणावरुन त्याचा प्रत्यय आला. प्रत्येक प्रौढाकडे पाटी, पेन्सील व साक्षरता अभियान समितीने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाची पुस्तके होती.

## ५.२२ शैक्षणिक साहित्याचा वापर

प्रौढांच्या शिक्षणात अनेक प्रकारच्या साहित्याला फार महत्त्व आहे त्यांचे आकलन पूर्ण व्हावे म्हणून ही साधने सर्व परिचित आहेत. पण त्यांचा उपयोग पूर्वी झालेल्या साक्षरता अभियानात जसा करुन घ्यायला हवा तसा

झालेला नाही. या साधनांचा उपयोग कार्यकर्ते आणि शिकणारे प्रौढ यांना सारखाच महत्त्वाचा आहे. या निरक्षरांच्या शिक्षणात साधनांचा उपयोग करताना ज्ञान आणि माहिती याबरोबरच अभिरूचीच्या संवर्धनाचे काम करावयाचे आहे.

चित्रपट, आकाशवाणी आणि दूरदर्शन यांसारखी अत्यंत प्रभावी संपर्क साधने विकसित झालेली आहेत व त्याचा फार मोठा पगडा जनमनावर आहे. याद्वारे ज्ञान, माहिती, रंजन आणि उद्बोधन करता येते. प्रौढ शिक्षण मोहिमेचा साक्षरता निर्माण करणे हे एकमेव उद्दिष्ट नाही पण कार्यात्मक साक्षरतेतून विकासाच्या वाटा फुटणार आहेत. आपल्या दैनंदिन अध्यापनात वापरले जाणारे शैक्षणिक साहित्य वापरूनही अध्यापनात मनोरंजकता आणता येते. अशा साहित्याचा वापर केल्याने नावीन्यता येते. प्रत्यक्ष पाहिलेले दिर्घकाळ स्मरणात राहते व चटकन समजते. यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर नेहमीच व्हावा. पण काहीजण याचा कंटाळा करताना दिसून येते. यातील कांही शैक्षणिक साधने तयार करणेही सोपे आहे. टाकाऊ साहित्यापासून ते तयार करता येतात व सुलभतेने हाताळता येतात.

काही महाग शैक्षणिक साहित्य शाळेत उपलब्ध असल्यास त्याचाही वापर शालेय प्रमुखांच्या परवानगीने आपण करू शकतो. या अभियानात शिक्षकांनी कोणकोणते साहित्य वापरलेले आहे त्यासंबंधी माहिती मिळविल्यानंतर पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली.

## कोष्टक क्रमांक २०

साक्षरता वर्गात कोणकोणत्या शैक्षणिक साहित्याचा
वापर केलात.

| अ. क्र. | शैक्षणिक साहित्य | साहित्य वापरलेले प्रतिसादक | | साहित्य न वापरलेले प्रतिसादक | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शेकडा प्रमाण | संख्या | शेकडा प्रमाण |
| १] | फ्लॅनेल बोर्ड | ३८ | ३३.९२ | ७४ | ६६.०७ |
| २] | आकाशवाणी | ०७ | ६.२५ | १०५ | ९३.७५ |
| ३] | टेपरेकॉर्डर | १६ | १४.२८ | ९६ | ८५.७१ |
| ४] | प्रोजेक्टर | – | – | ११२ | १००.०० |
| ५] | गणित संच | २५ | २२.३२ | ८७ | ७७.६८ |
| ६] | स्लाईड शो | ०२ | १.७८ | ११० | ९८.२१ |
| ७] | कॅटरपिलर मुळाक्षरे | ४८ | ४२.८५ | ६४ | ५७.१४ |
| ८] | दूरचित्रवाणी | ०७ | ६.२५ | १०५ | ९३.७५ |
| ९] | अक्षर जुळवणी | ४३ | ३८.३९ | ६९ | ६१.६१ |
| १०] | फलक | ११२ | १००.०० | – | – |
| ११] | पाठ्यपुस्तके | ११२ | १००.०० | – | – |
| १२] | तक्ते | ७२ | ६४.२९ | ४० | ३५.७१ |
| १३] | तरंगचित्र | १५ | १३.३९ | ९७ | ८६.६१ |
| १४] | अक्षरपट्टया | ६१ | ५४.४६ | ५१ | ४५.५४ |
| १५] | शब्दपट्टया | ४० | ३५.७१ | ७२ | ६४.२९ |
| १६] | नकाशा | ११ | ९.८२ | १०१ | ९०.१८ |
| १७] | पृथ्वीचागोल | ०२ | १.७८ | ११० | ९८.२१ |
| १८] | वृत्तपत्र | ६० | ५३.५७ | ५२ | ४६.४३ |
| १९] | भित्तिपत्रके | ४८ | ४२.८५ | ६४ | ५७.१४ |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, फ्लॅनेल बोर्ड हे शैक्षणिक साहित्य वापरणारे प्रतिसादक ३३.९२ टक्के आहेत तर शैक्षणिक साहित्य न वापरणारे प्रतिसादक ६६.०७ टक्के आहेत. शैक्षणिक साहित्य अतिशय कमी किंमतीत तयार करून वापरता येते. त्यामुळे अध्यापनात नावीन्यता येते, त्यावर शब्दपट्टया, वाक्यपट्टया लावून चित्रावरुन माहिती सांगता येते. निरक्षरांना हाताळतांना आनंद होतो म्हणून अशी साधने वापरावीत. ज्या प्रतिसादकांनी अशी साधने वापरली नाहीत त्यांनीही त्याचा वापर केला असता तर नावीन्यता वाटली असती.

आकाशवाणीवरुनही विविध गाण्यातून, नाटयातून, निरक्षरांच्या अनुभवावरुन कित्येक कार्यक्रम सादर होतात व होत आहेत. याचा वापरही निरक्षरांना शिकविण्यासाठी करुन घेता येतो त्याव्दारे मनोरंजनही होते व ज्ञान मिळते. आकाशवाणी केंद्राशी संपर्क साधून अशा कार्यक्रमाची वेळ विचारुन ती वेळ प्रौढांना सांगून त्याना घरी ऐकण्यास प्रोत्साहीत करावे असा उपक्रम फक्त ६.२५ टक्के प्रतिसादकानीच राबविला आहे तर ९३.७५ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर केलेला नाही, हे प्रमाण खूपच आहे, यांनीही असा उपक्रम राबविला असता तर योग्य झाले असते त्यामुळे शिकण्याची प्रेरणा निर्माण होते.

टेपरेकॉर्डर या साधनाचा हल्ली शिक्षण क्षेत्राने फार उपयोग करून घेतलेला आहे. सुंदर आवाजात गाणी भरुन घेऊन, एकादी नाटयछटा, पोवाडा, भजन, कीर्तन ध्वनीफित करुन ती अध्यापनाच्या वेळी ऐकविता येते त्यामुळे प्रत्येकजण त्या आवाजाकडे लक्ष देऊन ऐकतो म्हणून याचा वापर अध्यापनात परिणामकारक ठरत असून पाठांतराच्या दृष्टीकोनातून ध्वनीफितीला फार महत्त्व आलेले आहे. या साधनाचा वापर या अभियानात १४.२८ टक्के प्रतिसादकांनी केला आहे तर ८५.७१ टक्के प्रतिसादकानी वापर केला नाही.

प्रोजेक्टर हे साधन सध्या शिक्षणक्षेत्रात वापरले जात आहे पण या अभियानात त्याचा कोणीही वापर केलेला नाही.

अंकगणितात अंकाचे ज्ञान, मुलभुत क्रिया शिकविण्यासाठी गणित संचाचा वापर करुन शिकविले जाते. सतत लिहण्यासाठी खडू-फळा न वापरता फॅनेल बोर्ड वर अंक लावून गणितसंचाच्याव्दारे अंकाची ओळख करुन देता येते. अशा संचाचा वापर २२.३२ टक्के प्रतिसादकांनी केलेला आहे तर ७७.६८ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर केलेला नाही.

स्लाईड-शो व्दारे सुध्दा माहिती देता येते. हे दृक साधन आहे. या वस्तू जरी महाग असल्या तरी एकादया मोठया शाळेत, महाविद्यालयातून आणून त्याव्दारे आरोग्यशिक्षण, व्यसनामुळे शरीरावर होणारे परिणाम, कुटुंबनियोजनाचे महत्त्व यासारखे विषय स्लाईड-शो च्या माध्यमातून दाखविता येतात. हे साधन मिळविणे सहज साध्य नसले तरी प्रयत्नानी ते मिळवून त्याचा वापर करुन घेता येतो. असा वापर १.७८ टक्के प्रतिसादकांनी केलेला आहे. हे प्रमाण फारच अत्यल्प आहे, तर न वापरणा-या प्रतिसादकांचे प्रमाण ९८.२१ टक्के आहे.

कॅटरपिलर मुळाक्षरे हे स्वस्तात मिळणारे साधन आहे. घरी देखील पुठ्ठा, कार्डशीट कागद यापासून बनविता येते. याचा वापर करुन पुस्तकांतील शब्द शिकविता येतात. याचा उपयोग ४२.८५ टक्के प्रतिसादकांनी केलेला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. याचा वापर न करणारे प्रतिसादक ५७.१५ टक्के आहेत. याही प्रतिसादकांना याचा वापर करुन घेऊन अध्यापनात नावीन्यता आणता आली असती.

दुरचित्रवाणी हे सध्या सर्वांकडे उपलब्ध असलेले दृक श्राव्य माध्यम आहे. मनोरंजनाबरोबरच बसल्या जागी माहिती देण्याचे महान कार्य आज दुरचित्रवाणी करत आहे. खास करुन प्रौढांच्या शिक्षणावर आधारीत असे कार्यक्रम दर शनिवारी सकाळी दहा वाजता "सबरंग" आणि शुक्रवारी सकाळी नऊ वाजता "भैस बराबर" यासारखे कार्यक्रम दाखविले जात होते तेही प्रौढांना पाहता आले असते, याची माहिती शिक्षकांनी त्यांना देणे गरजेचे होते. याचा वापरही फक्त ६.२५ टक्के प्रतिसादकांनीच केलेला आहे. शिक्षकांनी तळमळीने काम केले नाही हेच यावरुन समजते. या माध्यमाचा वापर करुन न घेणारे प्रतिसादक ९३.७५ टक्के आहेत.

अक्षर जुळवणी हे स्वस्तात मिळणारे साहित्य आहे, ते घरीही बनविता येते. याचा वापर करुन छोटे छोटे शब्द, वाक्य तयार करता येतात. अपूर्ण शब्द देऊन अक्षर ओळखण्यासाठी कोणत्या अक्षरांची गरज आहे ते विचारुन पूर्ण करुन घेता येते. या साहित्याचा वापर करणारे प्रतिसादक ३८.३९ टक्के आहेत तर ६१.६१ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर केलेला नाही, यांनीही याचा वापर करावा त्यामुळे निरक्षरांना शिक्षणे कंटाळवाणे वाटणार नाही व कांहीतरी नवीन शिकल्याचा आनंद प्रौढांना मिळतो.

"फलक" हा शिक्षणातील महत्त्वाचा घटक आहे, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील सुसंवाद घडवून आणणारा आहे. फलकावर लिहताना काळजीपूर्वक व सुवाच्यलेखन करावे ते शिकणा-यावर परिणामकारक ठसा उमटविते. या अभियानात सर्वांनाच गुंडाळी फलक देण्यात आलेले होते, त्याचा उपयोग १०० टक्के प्रतिसादकांनी करुन घेतलेला आहे.

पाठ्यपुस्तके : राष्ट्रीय साक्षरता मिशनने प्रौढसाक्षरतेच्या अभ्यासक्रमाचे तीन टप्पे ठरविले आहेत. त्या तीन टप्प्यांसाठी आपले

शिक्षण-१, आपले शिक्षण-२, आपले शिक्षण-३ अशी तीन प्रारंभिक पुस्तके तयार करण्यात आली आहेत, त्याचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे -

टप्पा-१ :

१] नेहमीच्या वापरातील जोडाक्षरविरहीत शब्द आणि वाक्ये वाचता येणे.

२] पन्नास पर्यन्त अंक वाचता व लिहिता येणे.

३] स्वतःचे नाव लिहिता येणे.

टप्पा-२ :

१] नेहमीच्या वापरातील जोडाक्षरे असलेले शब्द आणि वाक्ये वाचता येणे.

२] १०० पर्यन्त अंक वाचणे व लिहिणे, व साधी बेरीज व वजाबाकी करता येणे.

३] स्वतःचा पत्ता, घरातल्या माणसांची नावे इत्यादी लिहिता येणे.

टप्पा-३:

१] सोपा परिच्छेद वाचता येणे व समजणे. [वृत्तपत्रातील मथळे, रस्त्यांची नावे, अपरिचित परिच्छेद इत्यादी]

२] साधे अर्जाचे नमुने भरता येणे, पत्रव्यवहार करणे.

३] १०० पर्यन्तचे सोपे गुणाकार व भागाकार करणे.

४] दैनंदिन व्यवहारात अंकज्ञानाचा वापर करणे.

अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी वेळेचे नियोजन "साक्षरता स्वयंसेवक मार्गदर्शिका" या पुस्तकात दिलेले आहे.

आपल्याला सुमारे २०० तासात प्रौढाला साक्षर करायचे आहे त्याची विभागणी पुढीलप्रमाणे -

| प्रारंभिक पुस्तिका आपले शिक्षण - | चर्चा घडयाळी तास | भाषा घडयाळी तास | अंकज्ञान घडयाळी तास | एकूण घडयाळी तास | आवश्यक उपस्थितीचे दिवस |
|---|---|---|---|---|---|
| भाग - १ | १५.०० | ३७.५० | १५.०० | ६७.५० | ४५ |
| भाग - २ | १८.७५ | ३३.७५ | १५.०० | ६७.५० | ४५ |
| भाग - ३ | २२.५० | ३०.०० | १५.०० | ६७.५० | ४५ |
| एकूण | ५६.२५ | १०१.२५ | ४५.०० | २०२.५० | १३५ |

सर्वसाधारणपणे असे दिसून आले आहे की प्रौढाने मन लावून अभ्यास केला तर ही कौशल्ये त्याला २०० तासात प्राप्त होऊ शकतात. पण त्यासाठी त्याने दररोज दीड तास शिकायचे आहे.

वरील तीनही पुस्तकाचा वापर या अभियानात संपूर्ण म्हणजे १०० टक्के प्रतिसादकांनी केलेला आहे.

"तक्ते" हे मुद्दा एक प्रभावी असे शैक्षणिक साहित्य आहे. विविध सोपे शब्द, वाक्य, अंक यासाठी विविध माहिती चित्रस्वरूप व वर्णनातून देण्यासाठी या प्रकारचे तक्ते तयार करून वापरता येतात. या प्रकारचे साहित्य घरच्या घरी तयार करता येते किंवा बाजारातूनही विकत मिळते. या प्रकारचे तक्ते या साक्षरता अभियानात ६४.२९ टक्के प्रतिसादकांनी वापरले आहेत तर ३५.७१ टक्के प्रतिसादकांनी असा प्रयत्न केलेला नाही. तरी अशा प्रकारची सहजसुलभ साधने वापरुन अध्ययन-अध्यापन मनोरंजक व सहज समजण्यायोग्य होते.

"तरंगचित्र" हे अतिशय आकर्षक व चित्त वेधून घेणारे असे शैक्षणिक साधन आहे. याचाही वापर सोपे शब्द अंक, विविध माहिती देण्याकरिता करुन घेता येतो. जाहिरातीत या सारख्या तरंगचित्र जास्त प्रमाणात वापरली जातात.

अशा तरंगचित्राचा वापर १३.३९ टक्के प्रतिसादकांनी प्रौढांना शिकविण्याकरीता केलेला आहे तर ८६.६१ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर केलेला नाही.

"अक्षरपट्टया" हे साधन ५४.४६ टक्के प्रतिसादकांनी वापरलेले आहे. ४५.५४ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर केला नाही. विविध जोडाक्षरविरहीत अक्षरे, जोडाक्षरे शिकविण्यासाठी या अक्षरपट्टया वापराव्यात.

"शब्दपट्टया" ह्याचा देखील वापर आपल्याला अक्षरपट्टयाप्रमाणे करुन घेता येतो. त्याप्रमाणे प्रौढाना शिकवताना ३५.७१ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर करुन घेतलेला आहे तर ६४.२९ टक्के प्रतिसादकांनी याचा वापर केलेला नाही.

नकाशाचा वापर करून भौगोलिक स्थान, विस्तार, क्षेत्रफळ, इतर नैसर्गिक ठिकाणे, महत्त्वाची स्थाने दाखविता येतात. या अभियानात ९.८२ टक्के प्रतिसादकानी उपयोग केलेला आहे तर ९०.१८ टक्के प्रतिसादकांनी नकाशाचा वापर केला नाही.

पृथ्वीचा गोल १.७८ टक्के प्रतिसादकांनी वापरलेला असून ९८.२१ टक्के प्रतिसादकांनी त्याचा वापर केलेला नाही.

"वृत्तपत्र" हे नित्यनूतन ज्वलंत माहिती देणारे स्वस्त असे साधन आहे. यातील विविध माहिती नियमित प्रौढांना वर्गात वाचून दाखवून त्यांना नियमित घडणा-या घडामोडी सांगून नवीन ज्ञान देता येते. याचा उपयोग ५३.९७ टक्के प्रतिसादकांनी केलेला आहे तर ४६.४३ टक्के प्रतिसादकांनी या सहजसुलभरित्या मिळणा-या साहित्याचा वापर केलेला नाही ही चिंताजनक बाब आहे.

भित्तिपत्रके : साक्षरता अभियानाचे बोधचिन्ह, घोषणावाक्ये लिहून सर्वत्र चिकटवली गेली. इतरही भित्तिपत्रके वापरुन त्याव्दारे प्रौढांना माहिती देता येते. या पध्दतीने ४२.८५ टक्के प्रतिसादकांनी उपयोग करुन घेतलेला आहे तर ५७.१४ टक्के प्रतिसादकांनी या साधनाचा वापर केलेला नाही.

निरीक्षणावरुनही संशोधिकेस असे दिसून आले की, प्रौढ साक्षरता वर्गात वर्ग घेणारे शिक्षक त्या त्या घटकानुसार शैक्षणिक साहित्य वापरताना दिसून आले. शैक्षणिक साहित्याच्या वापरामुळे अध्ययन व अध्यापन प्रभावी व परिणामकारक होते.

## ५.२३ साक्षरता अभियानात वापरलेले इतर साहित्य

साक्षरता अभियानात विविध शैक्षणिक साहित्य वापरलेले आहे. त्याव्दारे प्रौढांना एका आगळ्यावेगळ्या माध्यमातून प्रतिसादकांनी अध्यापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याशिवाय इतरही काही नित्यपरिचयाच्या वस्तू माहितीव्दारेही शिकविण्याचा प्रयत्न केला आहे. हया वस्तू व माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## कोष्टक क्रमांक २१ [अ]

शैक्षणिक साधनात बिया, चिंचोके, गोटया यांचा वापर

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | या साधनांचा वापर केला | ३२ | २८.५७ |
| २] | या साधनांचा वापर केला नाही | ८० | ७१.४३ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, बिया, चिंचोके, गोटया यासारख्या सहज मिळणाऱ्या वस्तू वापरुन अंकज्ञान, गणिती क्रिया शिकविणारे प्रतिसादक २८.५७ टक्के आहेत. अशा प्रकारचे साहित्य सहज मिळत असताना त्याचा वापर न करणारे प्रतिसादक शेकडा ७१.४३ आहेत.

## कोष्टक क्रमांक २१ [ब]

गणितातील गमती, कोडे सोडवून घेतले.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | गणितातील गमती, जमती, कोडे सोडवून घेतले. | ११ | ९.८२ |
| २] | असे साहित्य वापरले नाही | १०१ | ९०.१८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

गणितातील कोडी, गमती जमती सोडवून घेणारे प्रतिसादक ९.८२ टक्के आहेत, हे प्रमाण फारच कमी आहे. असे साहित्य न वापरलेले प्रतिसादक

९०. १८ टक्के आहेत त्यानाही गणितातील वरील साहित्य वापरुन गणितासारखा रुक्ष वाटणारा विषय मनोरंजक करता आला असता पण तसे केलेले नाही.

अशा सहजसुलभ मिळणा-या साहित्याचा वापर करून गणित पेटी, विज्ञान पेटी बनविता येते, त्याचा वापर करून घेता येतो.

५. २४ शाळा / समाजमंदिर येथील सोयीसंबंधी माहिती

कोष्टक क्रमांक २२ [अ]

शाळा / समाजमंदिर येथे बैठक व्यवस्थेची सोय

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ६० | १००.०० |
| २] | नाही | - | - |
| | एकूण | ६० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की या साक्षरता अभियानात काम करणा-या एकूण ११२ प्रतिसादकांपैकी ६० प्रतिसादक हे शाळा व समाजमंदिर येथे वर्ग चालवतात आणि या साठही प्रतिसादकांचे म्हणणे असे आहे की शाळा/समाजमंदिर येथे बैठक व्यवस्था आहे. म्हणजेच १०० टक्के प्रतिसादकांचे म्हणणे बैठक व्यवस्था आहे असे आहे.

कोष्टक क्रमांक २२ [ब]

शाळा/समाजमंदिर येथे फलकाची सोय.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ६० | १०० |
| २] | नाही | - | - |
| | एकूण | ६० | १०० |

वरील कोष्टकावरुन असे सांगता येते की १०० टक्के प्रतिसादकांच्या म्हणण्यानुसार सर्वच ठिकाणी फलकाची सोय आहे. आणि जिथे सोय नव्हती तिथे साक्षरता अभियान समितीकडून मिळालेले गुंडाळी फलक वापरण्यात आले.

कोष्टक क्रमांक २२ [क]

शाळा /समाजमंदिर येथे दिवाबत्तीची सोय.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ५० | ८३. ३३ |
| २] | नाही | १० | १६. ६७ |
| | एकूण | ६० | १००. ०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, दिवाबत्तीची सोय आहे असे सांगणारे प्रतिसादक ८३. ३३ टक्के आहेत तर दिवाबत्तीची सोय नाही म्हणणारे प्रतिसादक १६. ६७ टक्के आहेत. दिवाबत्तीची जिथे सोय नाही तिथे वर्ग लवकर सोडावे लागतात. हिवाळ्यात याचा त्रास झाला असे प्रतिसादकांचे म्हणणे होते. जिथे अशी सोय नव्हती तिथे अभियान समितीकडून सोय करुन देणे आवश्यक होते.

## कोष्टक क्रमांक २२ [ड]

शाळा/समाजमंदिर येथे पिण्याच्या पाण्याची सोय

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ५० | ८३.३३ |
| २] | नाही | १० | १६.६७ |
| | एकूण | ६० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शाळा व समाजमंदिर येथे पिण्याच्या पाण्याची सोय होती म्हणणारे ८३.३३ टक्के प्रतिसादक आहेत तर पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती असे सांगणारे १६.६७ टक्के प्रतिसादक आहेत.

## कोष्टक क्रमांक २२ [ड]

शाळा/समाजमंदिर येथे वर्गाचे ठिकाण हवेशीर व भरपूर प्रकाश देणारे आहे का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ५५ | ९१.६७ |
| २] | नाही | ०५ | ८.३३ |
| | एकूण | ६० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शाळा व समाजमंदिर येथे वर्गाचे ठिकाण हवेशीर व भरपूर प्रकाश येणारे आहे असे म्हणणारे ९१.६७ टक्के प्रतिसादक असून अशा प्रकारची जागा नाही म्हणणारे ८.३३ टक्के प्रतिसादक

आहेत. याचे प्रमाण जरी अत्यल्प असले तरी वर्ग हे नेहमीच शिकणा-याला आनंददायी वाटणारे व उल्हासित करणारे असावेत तरच शिकणे हे आनंददायी वाटते.

कोष्टक क्रमांक २२ [ई]

शाळा/समाजमंदिर येथे बाथरूमची सोय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ४४ | ७३.३३ |
| २] | नाही | १६ | २६.६७ |
| | एकूण | ६० | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे सांगता येते की, शाळा व समाजमंदिर येथे बाथरूमची सोय आहे म्हणणारे ७३.३३ टक्के प्रतिसादक आहेत तर बाथरूमची सोय नाही म्हणणारे २६.६७ टक्के प्रतिसादक आहेत. ज्या ठिकाणी अशा सोयी नाहीत तिथे अशा सोयी असणे आवश्यक आहे.

कोष्टक क्रमांक २२ [उ]

शाळा/समाजमंदिर येथे क्रिडांगणाची सोय

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | आहे | ३९ | ६५.०० |
| २] | नाही | २१ | ३५.०० |
| | एकूण | ६० | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, क्रिडांगणाची सोय आहे असे म्हणणारे प्रतिसादक ६५ टक्के असून क्रिडांगणाची सोय नाही म्हणणारे प्रतिसादक ३५ टक्के आहेत.

वरील सर्व विवेचनावरुन असे समजते की, शाळा व समाजमंदिर येथे प्रौढ वर्गासाठी आवश्यक असणा-या सोयी ब-याच प्रमाणात आहेत त्यामुळे प्रौढांनाही शिकण्यास येण्यास एक आगळावेगळा आनंद प्राप्त होतो. त्यामुळे दिवसभराचा थकवा कंटाळा नाहीसा होऊन ते उत्साही बनतात. शिकण्याकरीता आनंददायी वातावरणाची व उत्साही मनाची पुस्तकापेक्षा जास्त आवश्यकता आहे.

५.२५ साहित्य ठेवण्याची व्यवस्था

साक्षरता अभियानात प्रौढांना शिकण्यासाठी पाटी, पेन्सील, साक्षरता अभियान समितीने ठरवून दिलेली पुस्तके ही देण्यात आलेली होती हे शैक्षणिक साहित्य घरुन घेऊन येण्यास प्रौढांना लाजिरवाणे वाटत असे म्हणून ते साहित्य जाताना त्या वर्ग घेणा-या शिक्षकांकडेच ठेवून जात असत त्यावेळी ते साहित्य ठेवण्यासंबंधी शिक्षकांना अडचण आली. काही शाळा छोटया ठिकाणी भरतात तिथे जे समाजमंदिरात वर्ग घेतात तेथील शिक्षकांना विशेषत: जास्त अडचणी आली. समीतिकडुन त्याकरिता लाकडी किंवा पत्र्यांची पेटी मिळणे आवश्यक होते पण अशी सोय किती प्रतिसादकांना मिळाली ते पाहू.

कोष्टक क्रमांक २३

शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी लाकडी पेटी मिळाली का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | १२ | १०.७१ |
| २] | नाही | १०० | ८९.२९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, लाकडी किंवा पत्र्याची पेटी प्रौढांचे शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी उपलब्ध झाली असे सांगणारे १०.७१ टक्के प्रतिसादक आहेत. हे प्रमाण अत्यल्प आहे. अशी सोय सर्व शिक्षकांना मिळणे गरजेचे होते, त्यामुळे हे साहित्य साक्षरता वर्ग संपल्यानंतर रोज गोळा करून एकत्र ठेवणे सहज सुलभ झाले असते.

५.२६ साक्षरता वर्गासाठी वेळ देताना शिक्षकांना आलेल्या अडचणी

साक्षरता अभियान समितीने हे काम प्रामुख्याने प्राथमिक शिक्षकांना दिलेले होते त्यामुळे शालेय कामकाज सांभाळून त्याना अभियानांत साक्षरता वर्गासाठी वेळ देताना पुढीलप्रमाणे अडचणी आल्या.

## कोष्टक क्रमांक २४ [अ]

वैयक्तिक कामातून वेळ देणे.

| अ.क्र. | प्रतिसादक | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वैयक्तिक कामातून वेळ दिला. | ५१ | ४५.५४ |
| २] | वैयक्तिककामातून वेळ दिला नाही. | ६१ | ५४.४६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, शिक्षकांना शाळेच्या कामाचा वेळ संपल्यानंतर साक्षरता वर्गासाठी वेळ द्यावा लागला त्यामुळे त्यांची वैयक्तिक काही कामे तशीच बाजूला ठेवावी लागत व वर्गावर थांबावे लागे असे म्हणणारे प्रतिसादक ४५.५४ टक्के आहेत आणि वैयक्तिक कामे बाजूला ठेवून वेळ द्यावा लागला नाही असे म्हणणारे प्रतिसादक ५४.४६ टक्के आहेत.

## कोष्टक क्रमांक २४ [ब]

साक्षरता वर्ग संपल्यानंतर घरी जाण्यास वहानाची उपलब्धता

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | घर लांब असल्यामुळे वहान उपलब्ध झाले नव्हते. | ३७ | ३३.०४ |
| २] | अशी अडचण आली नाही. | ७५ | ६६.९६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शाळा व घर लांब अंतरावर असल्याने व साक्षरता वर्ग शालेय परिसरात घेत असल्याने ३३.०४ टक्के प्रतिसादकाना वर्ग घेऊन घरी परतण्यास वहान लवकर उपलब्ध होत नव्हते त्यामुळे घरी जाण्यास उशीर होई व घरातील मंडळी नाराज होत तर अशी अडचण न आलेले ६६.९६ टक्के प्रतिसादक आहेत.

कोष्टक क्रमांक २४ [क]

साक्षरता वर्गामुळे मुलाकडे लक्ष देता येत होते का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १] | मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नसे. | ७८ | ६९.६४ |
| २] | अशी अडचण आली नाही. | ३४ | ३०.३६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे निदर्शनास येते की स्वत:च्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नसे असे म्हणणारे प्रतिसादक ६९.६४ टक्के आहेत तर अशी अडचण आली नाही म्हणणारे प्रतिसादक ३०.३६ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, शाळा सुटल्यानंतर साक्षरता वर्ग घेत असल्याकारणाने संध्याकाळी घरी जाण्यास उशीर होई त्यानंतर घरची कामे शाळेची कामे यात वेळ निघून जाई त्यामुळे स्वत:च्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही असे प्रतिसादकांचे म्हणणे आहे. अशी अडचण भासली नाही म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण कमी आहे.

### कोष्टक क्रमांक २४ [ड]

साक्षरता वर्गामुळे घरामध्ये अडचणी येतात काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | मुलांचे आजारपण, एकादा कार्यक्रम पाहुणे आले तर वर्गास जाणे अडचणीचे होई. | ७५ | ६६.९६ |
| २] | अशाप्रकारच्या अडचणी आल्या नाहीत | ३७ | ३३.०४ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसते की, अडचण निर्माण झालेले प्रतिसादक ६६.९६ टक्के आहेत तर अडचण आली नाही म्हणणारे प्रतिसादक ३३.०४ टक्के आहेत.

वरील विवेचनावरून असे समजते, साक्षरता वर्ग घेणा-यात स्त्री शिक्षिकांचे प्रमाणही जास्त असल्याने मुलांच्या आजारपणाच्या काळात किंवा एखादा कार्यक्रम असताना, अचानक कोणी पाहुणे आले तर साक्षरता वर्गासाठी वेळ देताना अडचणी येत. वर्गावर थांबले नाही तर दुस-या दिवशी निरक्षर संख्या कमी होई हे ही तितकेच सत्य होते अशा अनेक अडचणी साक्षरता वर्गाना वेळ देताना आलेल्या आहेत. कांही प्रतिसादकाना शाळा, घर साक्षरता वर्ग घेणे यामुळे ओढाताण होई. घरात वर्ग घेणा-यांनाही वेळ देताना अडचणी आलेल्या आहेत. संध्याकाळच्या वेळी घरातील कामे असत त्यावेळी प्रौढ साक्षरता वर्गासाठी येत. अपु-या जागेमुळेही अडचण निर्माण झालेल्या आहेत.

या सर्व अडचणीवर मात करुन प्रतिसादक साक्षरता वर्ग चालवत आहेत. वार्डप्रमुखांनीही ब-याच अडचणी सोडविल्या आहेत असे मुलाखतीवरुन समजते.

५.२७ शालेय कामकाज सांभाळून साक्षरता वर्ग चालविताना आलेल्या अडचणी

शालेय कामकाजात फक्त अध्यापनाचे कार्य नसून त्याअनुषंगाने येणारी इतर बरीच कामे शाळेत करावी लागतात. अध्यापनास अनुसरून तयार करावे लागणारे शैक्षणिक साधने, नियोजन, टाचण, सहली, विविध राष्ट्रीय सण, सहशालेय कार्यक्रम, क्रिडा, सांस्कृतिक कार्यक्रम अशी बरीच मोठी यादी देता येईल. ही सर्व कामे, शिवाय परीक्षा, मूल्यमापनाची कामे या सर्व कामांना वेळ देऊन साक्षरता वर्ग चालविताना खालील अडचणी आल्या.

कोष्टक क्रमांक २५ [अ]

दिवसभराच्या अध्यापनानंतर साक्षरता वर्ग घेणे कंटाळवाणे वाटले का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | कंटाळवाणे वाटले | ८० | ७१.४३ |
| २] | कंटाळवाणे वाटले नाही. | ३२ | २८.५७ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, दिवसभर शाळेत काम करून साक्षरता वर्ग घेण्यासाठी शिक्षकांना फारसा उत्साह असे असे वाटत नसे असे म्हणणारे प्रतिसादक ७१.४३ टक्के आहेत. हे प्रमाण व अडचण विचारात घेण्यासारखी आहे. त्याचा परिणाम साक्षरता वर्गावर होण्याची शक्यता आहे.

## कोष्टक क्रमांक २५ [ब]

### शालेय कार्यक्रमाच्या वेळी साक्षरता वर्ग बंद ठेवावेत लागले का.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | वर्ग बंद ठेवावे लागत. | ३२ | २८.५७ |
| २] | वर्ग बंद ठेवावेलागले नाहीत | ८० | ७१.४३ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, शालेय कार्यक्रमाच्या वेळी साक्षरता वर्ग बंद ठेवावे लागले असे म्हणणारे प्रतिसादक २८.५७ टक्के आहेत तर वर्ग बंद ठेवावे लागले नाहीत म्हणणारे प्रतिसादक ७१.४३ टक्के आहेत. होकारार्थी प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. साक्षरता अभियानसाठी कालबध्दता असल्याने असे वर्ग बंद राहिले तर अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होणार नाही तरी अशा प्रतिसादकांनी वर्ग चालू ठेवण्याचा प्रयत्न करावा.

## कोष्टक क्रमांक २५ [क]

### साक्षरता वर्गावर जाण्यास उशीर झाल्यास प्रौढ परत निघून जात होते का.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | प्रौढ निघून जात | ६९ | ६१.६१ |
| २] | प्रौढ निघून जात नव्हते. | ४३ | ३८.३९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, काही कारणामुळे शाळा सुटल्यानंतर थांबून साक्षरता वर्गावर जाण्यास उशीर झाला की निरक्षर परत जात असत असे म्हणणारे प्रतिसादक ६१.६१ टक्के आहेत तर अशी अडचण निर्माण झाली म्हणणारे प्रतिसादक ३८.३९ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, निरक्षरांना शिकण्यात फारशी गोडी नसल्याने थोडया शुल्लक कारणावरुनही ते वर्ग सोडून निघून जात असत तर कित्येक वेळा त्यांना परत जावून बोलावून आणावे लागे. या सर्व जबाबदारीमुळे ताणतणाव निर्माण होई तर कधी कधी वर्ग चालविणे बंद करावेसे वाटे असे प्रतिसादक म्हणताना दिसून आले.

## ५.२८ साक्षरता कामाचा व्यावसायिक कामावर झालेला परिणाम

साक्षरता कामात वारंवार मिटींगला जाणे, मागितलेली माहिती पुरविणे. साक्षरता वर्गासाठी येणा–या प्रौढांच्या भेटी घेणे वगैरे करावे लागत असे त्यामुळे कधी वर्ग एकत्र ~~एकत्र/~~ करुन बैठकांना उपस्थित रहावे लागे. वर्गात बसून मागितलेली माहिती ताबडतोब भरुन दयावी लागे त्यामुळे वर्गात विद्यार्थ्यांना अभ्यास देऊन काही वेळेस ती माहिती दयावी लागली. जेव्हा संशोधिकेने प्रश्नावली व्दारा यासंबंधी माहिती मिळविली तेव्हा खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## कोष्टक क्रमांक २६

साक्षरता कामाचा व्यावसायिक कामावर परिणाम
झाला का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ५३ | ४७.३२ |
| २] | नाही | ५४ | ४८.२२ |
| ३] | प्रतिसाद न दिलेले | ०५ | ०४.४६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, साक्षरता कामाचा व्यावसायिक कामावर परिणाम झाला असे म्हणणारे ४७.३२ टक्के प्रतिसादक असून तसा कोणताही परिणाम झाला नाही असे म्हणणारे ४८.२२ टक्के प्रतिसादक आहेत तर कोणतेही उत्तर न देणारे प्रतिसादक ४.४६ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे म्हणता येते की, व्यावसायिक परिणाम झाला म्हणणारे प्रतिसादक ४७.३२ टक्के असून त्याच्याकडे शिक्षकांची संख्या कमी असल्याने त्यांना वारंवार अशी कामे करावी लागत असतील किंवा विद्यार्थी हे अभ्यासात असल्याने अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले असेल किंवा शिक्षक वर्गात येत नाहीत हे माहित झाल्यानंतर काही भागातील विद्यार्थी अनुपस्थित राहतात. अशा कारणामुळे व्यावसायिक कामावर परिणाम झाला असेल. वर्ग, शाळा, घर, वैयक्तिक व्यापामुळे इतर अध्ययनास वेळ मिळत नसावा अशा अनेक समस्या त्यामुळे निर्माण झाल्या.

व्यावसायिक कामावर परिणाम झाला नाही म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे ही समाधानाची गोष्ट आहे. काम करण्याची इच्छा असेल तर अशा अडचणीवर सहज मात करु शकतो.

साक्षरता कामाचा व्यावसायिक कामावर परिणाम झाला किंवा नाही यापैकी कोणतेच मत ४.४६ टक्के प्रतिसादकांनी व्यक्त केलेले नाही त्यामुळे कोणताही निष्कर्ष निघू शकत नाही.

व्यावसायिक कामावर थोडाफार परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही कामे शक्यतो सुशिक्षित बेकार तरुण, युवक संघटना, निवृत्त लोक, महिला मंडळे, धर्मादाय संस्था, स्वयंसेवी संघटना यांच्यामार्फत राबविले जावे. या लोकांच्या शक्तीचा विधायक उपयोग होईल व कार्य ही नियोजनपूर्वक राबविली जाईल.

## ५.२९ साक्षरता कामाचा परिणाम व्यावसायिक कामावर झाल्याचे स्वरुप

साक्षरता कामाचा व्यावसायिक कामावर परिणाम झाल्याचे स्वरुप विचारले असता साधारणपणे पुढीलप्रमाणे माहिती मिळाली.

१] वेळेचे नियोजन करताना अडचण येई. त्यात पुन्हा प्रौढांच्या वेळेचा प्रामुख्याने विचार करावा लागला.

२] काही वेळेस विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर त्याचा परिणाम झालेला दिसून आला.

३] शाळा सुटल्यानंतर कधी जादा तास घेण्यास वेळ मिळत नसे.

४] संध्याकाळी वर्ग घतल्याने काही शाळेचे लिखाण असल्यास ते वेळ न मिळाल्याने कधी कधी वर्गातच पूर्ण करावे लागे.

५] शिक्षकांना हे काम दिल्याने अध्यापनाची पूर्वतयारी करण्यास अवांतर वाचणास वेळ मिळेनासा झाला.

६] स्त्री-शिक्षिकांचे प्रमाण जास्त असल्याने त्याना घर, मुले, शाळा, सामाजिक कार्य, वैयक्तिक अडीअडचणी या सर्व व्यापामुळे ते कंटाळत त्याचाही परिणाम अध्यापनावर होतो.

७] शालेय कामकाजात कधी-कधी बदल करावा लागला.

अशा स्वरूपाचा परिणाम कळत न कळत व्यावसायिक कामावर झालेला दिसून येतो.

याशिवाय प्राथमिक शिक्षकांचा यात मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याने लहान मुले वर्गात असतात त्यांना समजून घेऊन त्यांच्या कलानुसार शिकवावे लागते. जास्तीत जास्त लक्ष द्यावे लागते कारण या वयात खेळण्याची प्रवृत्ती जास्त दिसून येते. त्यांच्याकडे जर या वयात दुर्लक्ष झाल्यास त्यांना अभ्यासाची गोडी वाटणार नाही म्हणून या प्राथमिक शाळातील मुलांकडे शिक्षकांना जास्त लक्ष द्यावे लागते. असे वार्डप्रमुखाच्या मुलाखतीवरून समजले. त्यामुळे त्याच्यामते ही कामे प्राथमिक शिक्षकांवर लादू नयेत.

५.३० शालेय कामकाज, वैयक्तिक कामे सांभाळून साक्षरता वर्ग नियमितपणे चालवता येतात का ?

या प्रश्नासंबंधी प्रश्नावलीव्दारा माहिती गोळा गेली तेव्हा पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली.

कोष्टक क्रमांक २७

शालेय कामकाज, वैयक्तिक कामे सांभाळून वर्ग नियमित चालविता येताता काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ५८ | ५१.७९ |
| २] | नाही | ५१ | ४५.५४ |
| ३] | प्रतिसाद दिलेला नाही | ०३ | २.६७ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, शालेय कामकाज, वैयक्तिक कामे सांभाळून साक्षरता वर्ग नियमितपणे चालवता येतात असे म्हणणारे प्रतिसादक ५१.७९ टक्के आहेत तर ही कामे सांभाळून नियमितपणे वर्ग चालविता येत नाहीत असे म्हणणारे प्रतिसादक ४५.५४ टक्के आहेत. वर्ग नियमितपणे चालवू शकतो किंवा नाही यासंबंधी कोणतेही उत्तर न देणारे २.६७ टक्के प्रतिसादक आहेत.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, नियमितपणे सर्व कामकाज करुन साक्षरता वर्ग चालविता येतात हे म्हणणे खरेच समाधानकारक आहे. वर्ग

चालविताना अडचणी यानाही आल्या असतील पण त्यांनी यावर मात करुन वर्ग चालविले आहेत हे कौतुकास्पद आहे. ज्यांना वर्ग नियमितपणे चालवता आले नाहीत त्यांच्याही काही अडचणी निश्चितच महत्वाच्या असतील. लग्नकार्ये, आजार, परगावी जाणे, शालेय सहली, परीक्षा इतर काही कार्यक्रमामुळे या प्रतिसादकांना वर्ग नियमितपणे चालवता आले नाहीत तरी जादा तास घेऊन किंवा सुट्टीच्या दिवशी साक्षरता वर्गाचे तास घेऊन राहिलेला अभ्यासक्रम भरुन काढणे महत्त्वाचे आहे तरच ठरवून दिलेल्या कालावधीत प्रौढांना साक्षर करणे शक्य आहे.

कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न दिलेल्या प्रतिसादकांचे प्रमाण २.६७ टक्के आहे, त्यांनी उत्तर न दिल्याने त्यांच्याबद्दल कोणताच निष्कर्ष काढता येत नाही.

साक्षरता अभियानाची जबाबदारी प्रामुख्याने टाकलेली आहे ती ब-याच प्रमाणात योग्य आहे. परंतु शालेय कामकाज, वैयक्तिक कामे असताना पुन्हा अभियानात काम करणे त्रासाचे आहे त्यामुळे या कार्याविषयीची तळमळ फारशी दिसून आली नाही असे मुलाखतीवरुन समजले.

### ५.३१ निरक्षर साक्षरता वर्गास पूर्ण वेळ देऊ शकतात काय ?

साक्षरता वर्गास निरक्षर पूर्ण वेळ देऊ शकतात किंवा नाही यासंबंधी प्रश्नावलीव्दारा माहिती संशोधिकेने मिळविली तेंव्हा खालील माहिती प्राप्त झाली.

## कोष्टक क्रमांक २८

साक्षरता वर्गास निरक्षरांची पूर्णवेळ उपस्थिती असते काय.

| अ.क्र. | प्रतिसादक | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | २८ | २५.०० |
| २] | नाही | ८४ | ७५.०० |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, निरक्षर साक्षरता वर्गास पूर्णवेळ देऊ शकतात असे म्हणणारे शिक्षक फक्त २५ टक्के आहेत तर निरक्षर वर्गास पूर्णवेळ उपस्थित राहू शकत नाहीत असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण ७५ टक्के आहे, हे प्रमाण विचार करण्यासारखे आहे.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, निरक्षर साक्षरता वर्गास पूर्णवेळ उपस्थित राहणा-याचे प्रमाण फारच अत्यल्प आहे. दिवसभर कष्ट करुन, मोलमजुरी करुन उदरनिर्वाह करणा-याची संख्या या प्रौढांत जास्त आहे. हे काम करुन कंटाळून किंवा बाजारहाट करुन संध्याकाळी स्वयंपाकपाणी करावयाचे असल्याने ते कधी उशीरा वर्गात येतात तर कधी वर्गातून मध्येच निघून जातात तर काही कारणामुळे आजारपण, मुलाबाळांचे संगोपन, व्यसनी नव-याचा वर्गास जाण्यास विरोध, घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींचा विरोध, या वयात शिकून काय करायचे ही ठाम भूमिका या अशा अनेक कारणामुळे जेवढे निरक्षर ठरविले आहेत ते शंभर टक्के उपस्थित नसतात, त्याकरिता शासनाने काही यांच्या व रोजनदारीच्या समस्या प्रथम सोडवाव्यात तेव्हा कुठे ते शिकण्यास प्रवृत्त होतील.

भुकेने जीव व्याकुळ असताना आपण शिकविण्याचा प्रयत्न केला तर ते कधीच यशस्वी होणार नाही. कोणतीही गोष्ट शिकण्यासाठी मन स्वस्थ हवे तरच शरीर हे करण्यास सहकार्य करते.

## ५.३२ निरक्षरांच्या वैयक्तिक अडचणीमुळे वर्ग चालविताना आलेल्या अडचणी

निरक्षरांच्या वैयक्तिक अडचणीमुळे वर्ग चालविताना आलेल्या अडचणी कोणत्या व त्याचे स्वरूप काय याविषयी पुढील प्रमाणे माहिती उपलब्ध झाली.

कोष्टक क्रमांक २९ [अ]

निरक्षरांच्या घरातील वडीलधा-यांच्या विरोधामुळे वर्गात येत नसत.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | अशा विरोधामुळे कधी कधी येत नसत. | ७९ | ७०.५४ |
| २] | अशी अडचण आली नाही. | ३३ | २९.४६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, घरातील वडीलधा-या व्यक्तीचा, नव-याचा विरोध यामुळे बरेचसे प्रौढ वर्गास नियमित उपस्थित राहू शकत नव्हते. तर कधी कधी मध्येच वर्गास येणे बंद करत असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण ७०.५४ टक्के आहे आणि अशा प्रकारची अडचण आली नाही असे म्हणणारे प्रतिसादक २९.४६ टक्के आहेत.

कोष्टक क्रमांक २९ [ब]

साक्षरता वर्गात झालेला अभ्यास पुन्हा पुन्हा घ्यावा लागे.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | अभ्यास पुन्हा पुन्हा घ्यावा लागतो. | ६८ | ६०.७१ |
| २] | असे करावे लागत नाही. | ४४ | ३९.२९ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, साक्षरता वर्गात झालेला अभ्यास प्रौढ घरी गेल्यानंतर करत नसत त्यामुळे त्यांना त्या भागाचा सराव वर्गात पुन्हा पुन्हा घ्यावा लागे त्यामुळे पुढील भाग घेण्यास वेळ लागे. त्यामुळे निरक्षरांना वाटे की अभ्यास आम्हाला जमत नाही. अशा प्रकारची अडचण आलेले प्रतिसादक ६०.७१ टक्के आहेत आणि अशा प्रकारची अडचण आली नाही म्हणणारे प्रतिसादक ३९.२९ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, प्रौढांच्या वैयक्तिक अडचणीमुळे त्यांना सराव करण्यास वेळ मिळत नाही. त्यांच्या विवंचनेमुळे शिकविलेला भाग पटकन लक्षात येत नाही त्यामुळे कंटाळून वर्गास येणे बंद करतात, पुन्हा जाऊन समजावून वर्गात आणावे लागत असे.

कोष्टक क्रमांक २९ [क]

या वयात शिकून काय करायचे ? हया भूमिकेमुळे अडचण.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | या भूमिकेमुळे अडचण निर्माण झाली. | ७२ | ६४.२९ |
| २] | अशी अडचण निर्माण झाली नाही | ४० | ३५.७१ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे सांगता येते की, शिकण्यासंबंधीची अनास्था व या वयात शिकून करायचे काय ? या प्रौढांच्या ठाम भूमिकामुळे ते वर्गास येण्यास टाळाटाळ करतात, आले तरी आम्हाला यात काही समजत नाही आता शिकून तरी काय करायचे असे सारखे प्रौढांना वाटत असल्याने त्यांना सतत शिक्षणाचे महत्त्व पटवून दयावे लागे. निरक्षरतेच्या अज्ञानामुळे कसे नुकसान होते हे समजावून सांगावे लागते. अशा प्रकारची अडचण आलेले प्रतिसादक ६४.२९ टक्के आहेत तर अशी अडचण निर्माण झाली नाही असे म्हणणारे शिक्षक ३५.७१ टक्के आहेत.

संक्रांत दिवाळी यासारख्या दीर्घकालीन सुट्टीत काही वर्ग बंद पडले होते. पुन्हा चालू करताना बराच त्रास दयावा लागला. पुन्हा निरक्षरांना भेटी देऊन बोलावून आणावे लागले असे मुलाखतीवरुन दिसून आले आहे.

## ५.३३ निरक्षरांच्या साक्षरता वर्गास उपस्थित राहण्यासंबंधीच्या अडचणी

निरक्षरांच्या साक्षरता वर्गास उपस्थित राहण्यासंबंधीच्या अडचणींचा विचार केला असता खालील प्रमाणे अडचणी दिसून आल्या.

१] दिवसभर मोलमजुरीसाठी कामास जावे लागे. कामावरुन आल्यानंतर घरातील कामे करावी लागत त्यामुळे उपस्थित राहण्यात अडचण येत असे.

२] व्यसनी पतीच्या विरोधामुळे उपस्थित राहात नसत.

३] सण, समारंभ कार्यक्रम या कारणामुळेही उपस्थितीवर परिणाम होत असे.

४] त्याच्या सोयीनुसार वेळ दिले तरच उपस्थित राहात नाहीतर वर्गामध्ये येत नसत.

५] अभ्यासक्रम न समजल्यामुळे लवकर लक्षात येत नसले तर वर्गास येणे बंद करत.

६] परीक्षा घेणार म्हटल्यावरही उपस्थित राहात नसत कारण नापास होणे त्यांना ज लज्जास्पद वाटे. परीक्षेची भिती असे.

७] मजुरी करणा-याच्या कामाच्या वेळा ठराविक नसल्याने अडचण निर्माण होई.

८] लहान मुलांच्या संगोपनाचा प्रश्न तर कधी आजारी माणसाच्या शुश्रूषा यासाठी वर्गास उपस्थित राहात नव्हते.

९] सामाजिक बंधनामुळे काही निरक्षर वर्गात येत नव्हते.

१०] अज्ञान व गरीबी हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे.

५.३४ निरक्षरांचे उपस्थिती पत्रक

प्रौढांच्या उपस्थितीची नोंद ठेवण्यासाठी साक्षरता अभियान समितीकडून हजेरीपत्रके सर्वांना देण्यात आलेली होती त्यात नियमित प्रौढांनी हजेरी भरावयाची होती त्यासंबंधीची माहिती मिळविली असता खालील माहिती मिळाली.

कोष्टक क्रमांक ३०

उपस्थिती पत्रक नियमित भरली जात होती काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | १०७ | ९५.५४ |
| २] | नाही | - | - |
| ३] | कोणताही प्रतिसाद नाही | ०५ | ४.४६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, साक्षरता अभियान समितीकडून मिळालेल्या हजेरीपत्रकात आलेल्या प्रौढांची नोंद नियमितपणे केली जात होती असे सांगणारे प्रतिसादक ९५.५४ टक्के आहेत हे प्रमाण चांगले आहे आणि ४.४६ टक्के प्रतिसादकांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही त्यामुळे ते नियमित हजेरी भरत होते किंवा नाही यासंबंधी काहीच सांगता येत नाही.

वरील विवेचनावरून असे सांगता येते की, साक्षरता अभियानांतर्गत दिलेल्या हजेरी पत्रकावरून ते नियमित उपस्थित राहतात किंवा नाही हे समजणे

सोपे होते. नियमित उपस्थिती असेल तर अभ्यासक्रम ठरल्याप्रमाणे पूर्ण झाला किंवा नाही हे समजते. याशिवाय अभियान कोणत्यापध्दतीने चालू आहे हे समजते यासाठी उपस्थितीपत्रक भरणे आवश्यक होते व भरले गेले ही गोष्ट चांगली आहे.

जेव्हा संशोधिकेने प्रत्यक्ष साक्षरता वर्गाचे निरीक्षण केले तेव्हा हजेरीपुस्तके नियमित भरलेली आढळून आली.

५.३५ प्रत्यक्ष साक्षरता वर्ग घेताना आलेल्या अडचणी

प्रत्यक्ष साक्षरता वर्ग जेव्हा चालू झाले तेंव्हा आलेल्या अडचणी खालीलप्रमाणे आहेत.

कोष्टक क्रमांक ३१ [अ]

साक्षरता वर्गात निरक्षरांची अनियमित उपस्थिती.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | अनियमित उपस्थिती होती. | ८१ | ७२.३२ |
| २] | अशी अडचण आली नाही | ३१ | २७.६८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, निरक्षरांची अनियमित उपस्थिती होती असे सांगणारे प्रतिसादक ७२.३२ टक्के आहेत तर ~~निर~~निरक्षरांच्या अनियमित उपस्थितीची अडचण आली नाही असा प्रतिसाद देणारे २७.६८ टक्के प्रतिसादक आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, निरक्षर अनियमित वर्गास उपस्थित राहात नव्हते असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे. ही बाब विचार करण्यासारखी आहे. अनियमितपणामुळे अभियानाचे ठरलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण होणार नाही व वर्ग चालविणारे शिक्षकही कंटाळून जातील तरी निरक्षरांना वर्गात येण्यासाठी कांहीतरी प्रोत्साहनपर देणे आवश्यक आहे.

कोष्टक क्रमांक ३१ [ब]

साक्षरता वर्ग घेताना भाषिक समस्या आली का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | ४८ | ४२.८६ |
| २] | नाही | ६४ | ५७.१४ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे सांगता येते की, काही ठिकाणी भाषिक समस्या निर्माण झाली असे सांगणारे प्रतिसादक ४२.८६ टक्के आहेत. तेलगू भाषिकाचे प्रमाण जास्त असल्याने त्यांना मराठी समजत नसे त्यामुळे ज्यांना मराठी समजते त्यांच्याकडून त्यांना सांगावे लागे. कन्नड भाषिकांची ही थोडीफार संख्या होती तेथे काही प्रमाणात अडचण आली. भाषेच्या अडचणीमुळे नीट समजावून सांगता येत नसे. भाषिक समस्या आली नाही असे म्हणणारे प्रतिसादक ५७.१४ टक्के आहेत, हे प्रमाण जरी जास्त असले तरी समस्या आलेल्याचे प्रमाण विचार करण्यासारखे आहे. ज्या शिक्षकांना भाषा अवगत आहे त्यांनाच वर्ग चालविण्यास दिले असते तर ही अडचण सोडविता आली असती.

कोष्टक क्रमांक ३१ [क]

साक्षरता वर्ग घेताना निरक्षरांना बोलावून आणणे.

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | मुलांना पाठवून बोलावून आणावे लागे | ५९ | ५२. ६८ |
| २] | अशी अडचण आली नाही. | ५३ | ४७. ३२ |
| | एकूण | ११२ | १००. ०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की निरक्षर जर वेळेवर वर्गास आले नाहीत तर त्यांना विद्यार्थ्यांकडून बोलावून आणावे लागे असे म्हणणारे प्रतिसादक ५२. ६८ टक्के आहेत तर अशा प्रकारची अडचण आली नाही असा प्रतिसाद देणारे प्रतिसादक ४७. ३२ टक्के आहेत.

वरील विचनावरुन असे समजते की, बोलावून आणावे लागते असे म्हणणा-यांचे प्रमाण जास्त आहे. बोलावून आणावयाचे म्हणजे बळजबरीने त्यांना आणल्यासारखे व्हायचे. वर्गात आल्यावर पुन्हा त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे लागे व झालेला भाग वैयक्तिकरित्या समजावून द्यावा लागे. यावरुन असे सांगता येते की अजूनही निरक्षरांना शिक्षणाचे महत्त्व पटलेले नाही. शिकलेलेच बेकार आहेत आता आम्ही शिकून काय करणार हे नित्य ऐकून घ्यावे लागे.

## कोष्टक क्रमांक ३१ [ड]

### साक्षरता वर्गात स्त्रीया एक तासापेक्षा जास्त वेळ थांबतात काय.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | जास्त वेळ थांबत नाहीत | ९० | ८०.३६ |
| २] | अशी अडचण आली नाही. | २२ | १९.६४ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, प्रौढ शिक्षण वर्गात स्त्रीया एक तासापेक्षा जास्त वेळ ~~मरा~~ थांबण्यास तयार नसत असा प्रतिसाद देणारे प्रतिसादक ८०.३६ टक्के आहेत तर अशा प्रकारची अडचण आली नाही असा प्रतिसाद देणारे प्रतिसादक १९.६४ टक्के आहेत, नकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, स्त्रीयांना संध्याकाळच्या वेळी स्वयंपाक करावयाचा असल्याने, खरेदीसाठी बाहेर जाण्यामुळे तर कधी कार्यक्रमास जायचे आहे अशी विविध कारणे सांगून एक तासापेक्षा जास्त वेळ कधीच थांबत नसत. या शिवाय वर्गात येताना छोटे बाळ वगैरे असेल तर त्यालाही बरोबर आणत ती ही अडचण त्यांची सोडवावी लागे. दूरदर्शनवर एकादा चांगला कार्यक्रम असेल तरी वर्गात येत नसत, आले तर फार वेळ थांबत नव्हते. त्यामुळे सराव [illegible] होत नसे. आहे तोच अभ्यासक्रम वेळेत पूर्ण झालेला नाही. त्यांना थांबण्यासाठी सक्तीही करता येत नव्हती.

कोष्टक क्रमांक ३१ [इ]

साक्षरता वर्ग घेताना जागेची अडचण निर्माण झाली का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | २९ | २५.८९ |
| २] | नाही | ८३ | ७४.११ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, साक्षरता वर्ग घेताना जागेची अडचण भासली असे म्हणणारे २५.८९ टक्के प्रतिसादक आहेत तर अशी अडचण भासली नाही म्हणणारे ७४.११ टक्के प्रतिसादक आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, साक्षरता वर्ग घेण्यासाठी जरी शिक्षकांनी निश्चित जागा ठरविलेली होती तरी काही कारणामुळे उदाहरणार्थ शाळेतील कार्यक्रमामुळे, समाजमंदिरात जत्रा किंवा एखादा कार्यक्रम असेल तर, घरात वर्ग घेणा-यांना घरी कोणी पाहुणे आले मुळे जागा अपुरी असेल तर त्यादिवशी जागेची अडचण निर्माण होई व पर्यायी ठिकाणी वर्ग घ्यावे लागे नाहीतर वर्गास सुट्टी द्यावी लागे. अशा प्रकारची अडचण निर्माण झालेल्या प्रतिसादकांचे प्रमाणही बरेच आहे त्यामुळे त्याचाही परिणाम वर्गावर होई.

प्रत्यक्ष साक्षरता वर्ग चालू झाल्यानंतरही ब-याच ठिकाणी काही ना काही अडचणी येत त्या आम्ही सोडविण्याचा आमच्यापरीने प्रयत्न केला आहे तर काही अडचणी साक्षरता अभियान समितीकडून सोडवून घेतल्या असे मुलाखतीवरुन समजते.

## ५.३६ निरक्षराची अभियानासंबंधीची जागृती

सोलापूर शहरात जेव्हा साक्षरता अभियान राबविण्याचे ठरविण्यात आले तेव्हा वातावरण निर्मितीसाठी सर्वत्र भित्तीपत्रके लावण्यात आली. भिंतीवर साक्षरतेसंबंधी घोषवाक्ये लिहण्यात आली. कलाजथ्थ्यामार्फत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. निरक्षरांचा सर्व्हे करून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. मोठमोठया व्यक्तींची विचारवंतांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. शाळा, महाविद्यालये यांच्यामार्फत काही योजना राबविण्यात आल्या. हे सर्व प्रयत्न करूनही प्रौढ निरक्षर या साक्षरता अभियानासंबंधी कितपत जागृत होते यासंबंधी माहिती मिळविली असता खालील माहिती उपलब्ध झाली.

कोष्टक क्रमांक ३२

निरक्षर साक्षरता अभियानासंबंधी सर्वार्थाने जागृत होते का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | जागृत होते | ४९ | ४३.७५ |
| २] | जागृत नव्हते | ५७ | ५०.८९ |
| ३] | कोणताही प्रतिसाद नाही | ०६ | ५.३६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की, साक्षरता अभियानासंबंधी प्रौढ निरक्षर सर्वार्थाने जागृत होते म्हणणारे प्रतिसादक ४३.७५ टक्के असून नकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५०.८९ टक्के आहे. हे प्रमाण वरील

प्रकारे वातावरणनिर्मिती करूनही बरेच आहे व चिंताजणक आहे. प्रौढ साक्षरता अभियानासंबंधी जागृत होते किंवा नव्हते हे न सांगणारे प्रतिसादक ५.३६ टक्के आहेत. हे प्रमाणही विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहे. शिक्षकांना याची माहिती असणे आवश्यक आहे. शिक्षकांनी प्रौढांना साक्षरता अभियानासंबंधी माहिती करून देऊन जागृत करावे.

## ५.३७ नवसाक्षरांचे मूल्यमापन

नवसाक्षरांचे मूल्यमापन करण्याकरिता साक्षरता अभियान समितीकडून मिळालेल्या आपले शिक्षण भाग १, भाग २ मधील चाचणीवरुन मूल्यमापन केले. शासनाकडून आलेल्या प्रश्नपत्रिका सोडवून घेऊन त्याची नोंद संकलित पत्रकात केलेली आहे.

याशिवाय त्याच्या संभाषणावरुन, वाचन व लेखन यावरुन अंकज्ञान यावरुनही नोंदी केल्या. वृत्तपत्राचे वाचन घेऊन सही करता येणे, छोटया अकारान्त गोष्टीचे पुस्तक वाचनास देऊन या सर्व गोष्टीवरुन मूल्यमापन केले आहे.

शेवटच्या टप्प्याचे मूल्यमापन अजून व्हावयाचे आहे. समवर्ती मूल्यमापनाची तयारी झालेली आहे.

संशोधिकेनेही वर्ग निरीक्षणाच्या वेळी काही प्रौढांना वाचण्यास, लिहण्यास सांगितले, गाणी म्हणून घेतली, गणितातील काही संबोध विचारले त्याची प्रौढांनी उत्तरे दिली त्यावरुनही त्याचे मूल्यमापन केले. ज्यांना लिहता वाचता आले त्यांना अतिशय आनंद झालेला दिसून आला.

## ५.३८ नवसाक्षराच्या मूल्यमापनाच्या नोंदी

नवसाक्षराच्या मूल्यमापनाच्या नोंदी, आपले शिक्षण भाग १, भाग २ पूर्ण झाल्यानंतर त्याच पुस्तकातील चाचणी सोडवून घेऊन तेथेच नोंदी केल्या व प्रमाणपत्र तयार केले.

भाग ३ चे मूल्यमापनाचे काम चालू आहे. शासनाकडून अजून समवर्ती मूल्यमापन व्हावयाचे आहे. या मूल्यमापनानंतर काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर केल्या जाणार आहेत. मूल्यमापनाचे काम पूर्ण न झाल्याने संशोधिकेला मूल्यमापनासंबंधी योग्य अशी माहिती मिळाली नाही.

## ५.३९ नवसाक्षरांची संख्या

सोलापूर शहर साक्षरता अभियानांर्गत पहिल्या तीन प्रभागाचा विचार संशोधिकेने केलेला असून त्यामध्ये ११२ शिक्षकांची प्रतिसादक म्हणून निवड केलेली होती. त्या ११२ प्रतिसादकांनी अभियानासाठी १५ ते ३५ वयोगटातील ३१४० प्रौढ निरक्षरांची निवड केलेली असून त्यापैकी १६९८ प्रौढ नवसाक्षर झाले हे त्यांच्या आपले शिक्षण भाग १ व आपले शिक्षण भाग २ या पुस्तकांच्या मूल्यमापनावरून व शासनाने घेतलेल्या मूल्यमापनावरून आढळून आलेले आहे. नवसाक्षरांचे शेकडा प्रमाण ५४.०८ टक्के इतके आहे.

निरक्षर संख्या शंभर टक्के पूर्ण होणे आवश्यक होते पण निरक्षरांच्या अनेक अडचणीमुळे, अनियमितपणा, उदरनिर्वाहासाठी मोलमजुरीस जाणे, एखादे नैसर्गिक संकटामुळे कोसळून जाणे, घरातील वरिष्टांचा विरोध,

व्यसनी नवरा, शिक्षणाबद्दलची अनास्था, प्रौढ वर्गात येणे लज्जास्पद वाटणे, घरातील भांडण-तंटे, बाळंतपण, लहान मुलांचा सांभाळ करणारे घरी कोणी नसणे, विडया वळणे, आर्थिक समस्या, मध्येच घर सोडून जाणे अशी अनेक कारणे हे कार्य शंभर टक्के पूर्ण होण्यास कारणीभूत झाली. श्रीमंत कुटुंबातील निरक्षर तर स्वत:स निरक्षर म्हणवून घेण्यासही तयार नाहीत. ते वर्गात येण्यास उत्सुक नाहीत, अशा अनेक अडचणीमुळे निवडलेले सर्व निरक्षर नवसाक्षर झालेले नाहीत.

नवसाक्षरासाठी साक्षरोत्तर कार्यक्रम निरंतर राबविणे व त्याचा पाठपुरावा शासनाने करण्याची गरज आहे. नाहीतर झालेले नवसाक्षर निरक्षर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही असे मुलाखतीवरुन समजते.

## ५.४० साक्षरता अभियानासंबंधी निरक्षरांची मते

साक्षरता अभियानासंबंधी निरक्षरांचा सकारात्मक दृष्टीकोन तर काही निरक्षरांचा नकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो.

१] साक्षर झाल्याने गरीबी जाईल काय ?

२] शिकण्यास आल्यानंतर काही सोयी देणार का ? नोकरी देणार का ?

३] या वयात शिकून काय करणार ? शिकलेल्यानाच नोकरी नाही.

४] काम केल्याशिवाय पोट भरत नाही, शिकून काय पोट भरणार आहे ?

५] आम्हाला शिकवून काय करता, आमच्या मुलाबाळांना चांगलं शिकवा.

६] शिकावे वाटते पण काम करणे भाग पडते.

७] सुस्थितीत राहणारे बरेच निरक्षर साक्षरतेबद्दल उदासिन दिसून आले.

८] शिकावे असे वाटते पण वेळ मिळत नाही.

९] ही एक सरकारने चांगली योजना काढली आम्हाला लहानपणी शिकता आले नाही आता तरी शिकतो.

१०] शिकल्यामुळे थोडे थोडे लिहता वाचता येऊ लागले त्याचा आनंद झाला.

११] शिकल्यामुळे आरोग्य, स्वच्छता, शिक्षणाचे महत्त्व कळू लागले आहे.

१२] आता कोणाशीही बोलताना भिती वाटत नाही, काही समजल नाही तर समजणा-याला विचारतो.

१३] वर्तमानपत्र वाचता येऊ लागल्याने कोठे काय चालले ते समजते.

१४] आपणही शिकून मोठे व्हावे असे वाटते.

१५] शिक्षणाचे महत्त्व आता समजू लागले आहे, आमच्या मुलांना खूप-खूप शिकणार व मोठा साहेब करणार.

अशा प्रकारची अनेक मते प्रतिसादकांना समजली व संशाधिका जेव्हा वर्ग निरीक्षणासाठी गेले तेव्हा त्यानाही अशी मते ऐकण्यास मिळाली यावरुन असे समजते सर्वच निरक्षर या अभियानासंबंधी उदासीन नाहीत तर काहीजणाना पूर्वी जे आपणास करता आले नाही ते आता आपण करु शकतो याचा आनंद वाटतो यावरुन आशेचा किरण नजरेस पडतो.

शासनाने थोडी आर्थिक मदत व सोयी जर या निरक्षरांना दिल्या तर निश्चितच शंभर टक्के साक्षरता आणणे सहज शक्य नसले तरी प्रयत्नांती शक्य होणार आहे.

५.४१ साक्षरता अभियान कार्यासाठी निधी

कोणतेही कार्य करण्यासाठी नियोजन, मनुष्यबळ जितके आवश्यक आहे तितकेच पर्यायाने थोडेसे जास्तच आर्थिक बाजू भक्कम असणे आवश्यक असते.

या अभियानात नियोजन होते. मनुष्यबळही मिळाले साक्षरता अभियान समितीकडून साहित्य वाटपही करण्यात आले. हे सर्व मिळाल्यानंतर इतरही कामासाठी निधीची गरज असते ती कितपत मिळाली याचा आढावा घेण्यात आला तेव्हा खालील माहिती उपलब्ध झाली.

कोष्टक क्रमांक ३३

साक्षरता अभियान कार्यासाठी निधी उपलब्ध झाला का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | होय | १६ | १४.२९ |
| २] | नाही | ९४ | ८३.९३ |
| ३] | काहीही प्रतिसाद नाही | ०२ | १.७८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, साक्षरता अभियान कार्यासाठी निधी मिळाला असे म्हणणारे प्रतिसादक १४.२९ टक्के आहेत तर निधी मिळाला नाही असे सांगणारे प्रतिसादक ८३.९३ टक्के आहेत आणि निधी मिळाला किंवा नाही असे कोणतेही उत्तर न देणारे प्रतिसादक १.७८ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, अत्यंत कमी प्रमाणात निधी मिळाला असे म्हणणा-या प्रतिसादकांचे मत आहे. साक्षरता वर्ग घेणा-याला व वर्गाला येणा-याला कोणत्याही प्रकारचे मानधन नसले तरी इतर कामासाठी थोडयाशा पैश्यांची का होईना गरज होती. निरक्षरांना शिकण्यात आनंद वाटावा म्हणून काही स्पर्धा घेऊन बक्षीसे देण्यात आली. एखादा कार्यक्रम आयोजित केला तरी चहा-पानाचा खर्च आला, हळदीकुंकू केले, तिळगूळ वाटपाचा कार्यक्रम यासारख्या कार्यक्रमांना पैसे खर्च करावेच लागतात. ही झळ काही ठिकाणी शाळांनी तर काही ठिकाणी शिक्षकांना सोसावी लागली तर काही भागात निधी न मिळाल्याने असे कार्यक्रम केले गेले नाहीत. निधी मिळाला नाही असे म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. पहिल्या भागाच्या वेळी काही रक्कम विभागप्रमुखाकडून काही शाळांना मिळाली त्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तरी काही आर्थिक सहाय्य अशा योजना राबविताना प्रत्येकापर्यंत पोहोचते की नाही हे पाहणे आवश्यक आहे. १.७८ टक्के प्रतिसादकाना तर आर्थिक सहाय्य मिळाले म्हणावे किंवा नाही म्हणावे असा संभ्रम निर्माण झाल्याने त्यानी कांहीच उत्तर दिलेले नाही.

प्रौढांना प्रोत्साहन देण्यासाठी तरी काही ठराविक आर्थिक सहाय्य शासनाने करावे तरच ते वर्गास नियमित उपस्थित राहून साक्षर होण्याचा प्रयत्न करतील.

## ५.४२ साक्षरता अभियानात शिक्षकांनी केलेल्या कामाचे स्वरूप

साक्षरता अभियानात शिक्षकांनी अनेक स्वरूपाची कामे केलेली आहेत तर या संशोधनासाठी निवड केलेल्या ११२ प्रतिसादकांनी कोणकोणत्या स्वरूपाची भूमिका या अभियानात बजावली आहे ते खालील माहितीवरून स्पष्ट होते.

कोष्टक क्रमांक ३४

साक्षरता अभियानात शिक्षकांनी केलेल्या कामाचे स्वरूप

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | स्वयंसेवक | ५६ | ५०.०० |
| २] | निरीक्षक | ३८ | ३३.९३ |
| ३] | वार्डप्रमुख | १५ | १३.३९ |
| ४] | झोनप्रमुख | - | - |
| ५] | तज्ज्ञ मार्गदर्शक | ०३ | २.६८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे ~~स्पष्ट~~ समजते की, सोलापूर शहर साक्षरता अभियानात शिक्षकांनी स्वयंसेवक म्हणून काम करणारे ५० टक्के प्रतिसादक असून निरीक्षक म्हणून काम करणारे ३३.९३ टक्के प्रतिसादक आहेत. तसेच वार्डप्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडणारे १३.३९ टक्के प्रतिसादक असून तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करणारे २.६८ टक्के प्रतिसादक आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, शिक्षकांनी साक्षरता अभियानात बरीच चांगली कामे केलेली आहेत. प्राथमिक शिक्षकांना शालेय कामकाज, वैयक्तिक जबाबदा-या असूनही अभियानात सक्रीय सहभाग या शिक्षकांनी घेतलेला आहे. हे जरी राष्ट्रीय कर्तव्य असले तरी शिक्षकांच्या मानसिक व शारीरिक श्रमाचा विचार करुन अशा प्रकारची कामे समाजातील इतर व्यक्तीकडूनही करुन घेऊन त्यांच्याकडूनही विधायक कार्य शासनास करुन घेणे शक्य आहे.

वरील कोष्टकावरुन असे समजते की पंधरा प्रतिसादकांनी वार्डप्रमुख म्हणून काम पाहिलेले आहे. त्यांचीच संशोधिकेने या संशोधन कार्याच्या मुलाखतीसाठी निवड केलेली आहे.

## ५.४३ साक्षरता अभियानाची कालबध्दता

प्रत्येक कार्याची सुरुवात ही नियोजनाचे केल्यास त्याचा शेवटही चांगला होतो. साक्षरता अभियानाची ज्यावेळी सुरुवात झाली तेव्हा प्रत्येक अभ्यासक्रमासाठी आपले शिक्षण भाग १ साठी ६७.५० घडयाळी तास, भाग २ साठी ६७.५० तास आणि आपले शिक्षण भाग ३ साठीसुध्दा ६७.५० घडयाळी तास असे एकूण २०२.५० घडयाळी तासात प्रत्येक प्रौढ निरक्षरास साक्षर करावयाचे नियोजन होते.

या नियोजनाप्रमाणे काम करणे शक्य झाले किंवा नाही यासंबंधी प्रश्नावलीव्दारा माहिती मिळवली तेव्हा खालील माहिती प्रतिसादकाकडून मिळाली.

## कोष्टक क्रमांक ३५

### साक्षरता अभियान कार्यक्रम कालबध्द असल्याने योग्य आहे का.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | योग्य आहे | ५३ | ४७.३२ |
| २] | योग्य नाही | ४५ | ४०.१८ |
| ३] | उत्तर न देणारे | १४ | १२.५० |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरून असे समजते की साक्षरता अभियान ही कालबध्द असल्याने योग्य आहे असे म्हणणारे प्रतिसादक ४७.३२ टक्के आहेत तर साक्षरता अभियान कालबध्द असल्याने योग्य नाही असे म्हणणारे ४०.१८ टक्के प्रतिसादक आहेत. साक्षरता अभियान कार्यक्रम कालबध्द असावा की नसावा यापैकी काही न सांगणारे १२.५० टक्के प्रतिसादक आहेत.

वरील विवेचनावरून असे समजते की, योग्य आहे असा प्रतिसाद देणा-या प्रतिसादकांच्या मतानुसार नियोजन हे महत्त्वाचे आहे पण अयोग्य म्हणणारे प्रतिसादकांच्या मते निरक्षरांच्या अडचणीमुळे त्याना काळाचे बंधन नको आहे तर १२.५० टक्के प्रतिसादकांनी आपल्या प्रतिक्रियाच दिलेल्या नाहीत.

साक्षरता अभियान ही कालबध्द असल्याने ती योग्य आहे का त्यासंबंधी प्रतिसादकांची मते विचारली असता त्यानी खालील प्रमाणे आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

१] आर्थिकदृष्टीने योग्य आहे असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण ४.४६ टक्के आहे.

२] ही प्रक्रिया २००० सालापर्यंत पूर्ण करण्याचे धोरण असल्याने योग्य आहे असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण १६.९६ टक्के आहे.

३] ही योजना [illegible] कालबद्द असून चालणार नाही हे राष्ट्रीय कार्य असल्याने समाजातील सर्व स्तरातील सुशिक्षितानी या चळवळीत निस्वार्थ भावनेने काम करावे असे म्हणणा-यांचे प्रमाण ७.१४ टक्के आहे.

४] साक्षरता अभियान ही राष्ट्रीय विकासाला आवश्यक असल्याने ती निरक्षराचे उच्चाटन होईपर्यंत चालूच रहावे असे म्हणणारे प्रतिसादक १७.८६ टक्के आहेत.

५] आर्थिक परिस्थितीमुळे ज्यांना शिकता आले नाही त्यांच्यासाठी ही सुसंधी वाटते असे म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या ४७.३२ टक्के आहे.

६] ज्ञानार्जन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे म्हणून वेळेचे बंधन नको म्हणणारे १६.९६ टक्के प्रतिसादक आहेत.

७] निरक्षराच्या अनियमित उपस्थितीमुळे कालबद्दता जाचक ठरते असे सांगणारे प्रतिसादक २५ टक्के आहेत.

८] कालबद्दता आल्यास संपूर्ण साक्षरता १०० टक्के होणे अवघड आहे असे म्हणणारे ५९.८२ टक्के प्रतिसादक आहेत.

९] आपल्या लोकशाही राज्यात कोणतेही कार्यक्रम कालबद्द राबविणे कठीण आहे असे म्हणणारे ४.४६ टक्के प्रतिसादक आहेतत.

१०] कोणतेही काम करण्यासाठी नियोजन असणे आवश्यक असते तेव्हाच ते काम यशस्वी होऊ शकते म्हणून कालबद्दता असणे जरुरीचे आहे त्यामुळे योग्य वेळी त्याचे मूल्यमापन करुन कामाचा आढावा घेता येतो असे म्हणणारे प्रतिसादक १.७९ टक्के आहेत.

११] नवसाक्षराच्या शिक्षणात खंड पडला तर ते शिकलेले विसरतात म्हणून साक्षरोत्तर कार्यक्रम राबवावेत असे सांगणारे १४.२९ टक्के प्रतिसादक आहेत.

या मतावरुन असे सांगता येते की, नियोजन असणे आवश्यक असून कालबध्दतेमुळे झालेल्या कामाचे मूल्यमापन करुन त्याचा आढावा घेता येतो. काम कोणत्या रीतीने होत आहे ते समजते, सुधारणा हव्या असल्यास करता येतात म्हणून कालबध्दता आहे ती योग्य आहे.

## ५.४४ साक्षरता कार्यात शासनाचा सहभाग

या साक्षरता अभियान कार्यात शासनाचा सहभाग कितपत आहे यासंबंधी प्रतिसादकाकडून माहिती मिळवली असता खालील माहिती मिळाली.

कोष्टक क्रमांक ३६

साक्षरता कार्यात शासनाचा सहभाग कितपत आहे.

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | अंशत: सहभाग | ४८ | ४२.८६ |
| २] | पूर्ण सहभाग | ६२ | ५५.३६ |
| ३] | सहभाग नाही | ०२ | १.७८ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, अंशत: शासनाचा सहभाग आहे असा प्रतिसाद देणा-या प्रतिसादकांची संख्या ४२.८६ टक्के आहे तर या

कामात शासनाचा पूर्ण सहभाग आहे असे म्हणणारे ५५.३६ टक्के प्रतिसादक आहेत. शासनाचा सहभाग काहीही नाही असे म्हणणारे प्रतिसादक १.७८ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे सांगता येते की, शासनाचा अंशत: सहभाग आहे म्हणणा-यांचे प्रमाण बरेच आहे. त्यांच्यामते शासनानी फक्त अभियानाची सुरुवात करुन दिली, साहित्य पुरविले त्यानंतर प्रत्यक्ष कार्य करताना येणा-या अडचणी विचारण्यासाठी वा त्या सोडविण्यासाठी शासनाकडून कोणतेही प्रयत्न झालेले नाहीत. शासनाने या कामाची जबाबदारी त्या वार्डातील नगरसेवकांवर सोपविली असती तर हे कार्यक्रम राबविणे बरेच सुसहय झाले असते. या अभियानात नगरसेवकांनी पाहिजे तसे सहकार्य केलेले नाही. पाच वर्षाच्या कालावधीत त्यांनी त्यांचा वार्ड साक्षर करण्याची जबाबदारी त्या नगरसेवकांवर सोपवावी. त्यांनी त्याच्या अधिकारात ते काम त्या वार्डातील स्वयंसेवी संस्था, मंडळे, सुशिक्षित बेकार तरुण यांच्यामार्फत करुन घ्यावे.

शासनाच्या पूर्ण सहभाग या कामात आहे असे म्हणणारे प्रतिसादकांचे प्रमाण चांगले आहे. शासनाच्या सहभागाशिवाय हे काम आजच्या काळात तरी होणे अशक्य आहे. शासनाचा सहभाग या कार्यात आहे ही चांगली गोष्ट आहे. ज्या वेळेस श्री गुजराल पंतप्रधान होते तेव्हा त्यांनी संपूर्ण शंभर टक्के साक्षरता येण्यासाठी विद्यार्थ्यांनी ते वर्ग चालवावेत तरच त्यांना बारावीनंतर प्रमाणपत्र देण्यात येतील असे सांगितले. त्यानंतर यासंबंधी ब-याच उलटसुलट क्रिया-प्रतिक्रिया जनमानसात उमटल्या.

याशिवाय आपले मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी वेळ मिळेल तेव्हा स्वत: साक्षरतेचे वर्ग घेतात असे वाचण्यात आले. यावरुन असे समजते की

शासनही आपल्या परिने शंभर टक्के साक्षरता आणण्यासाठी अविरत प्रयत्न करत आहे.

साक्षरता अभियानात शासनाचा सहभाग नाही म्हणणारे १.७८ टक्के प्रतिसादक आहेत पण यांचे म्हणणे चुकीचे आहे, असे वाटते. कारण आपल्या राज्यघटनेत सुध्दा निरक्षरतेची समस्याच निर्माण होऊ नये म्हणून ६ ते १४ वयोगटातील सर्वांनाच मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जाईल असे नमूद केले आहे व त्या पध्दतीने सार्वत्रिकरणाचा व शंभर टक्के पटनोंदणीचा प्रयत्न होत आहे.

## ५.४५ निरक्षरांना प्रोत्साहन म्हणून मानधन

निरक्षरांना प्रोत्साहन म्हणून मानधनाची रक्कम द्यावी किंवा नाही यासंबंधी प्रश्नावलीव्दारा माहिती जमा केली ती पुढीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ३७

निरक्षरांना प्रोत्साहन म्हणून मानधन द्यावे असे वाटते काय

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १] | मानधन द्यावे | ७८ | ६९.६४ |
| २] | मानधन देण्याची गरज नाही | ३४ | ३०.३६ |
| | एकूण | ११२ | १००.०० |

वरील कोष्टकावरुन असे समजते की, निरक्षरांना प्रोत्साहन म्हणून मानधन द्यावे असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण ६९.६४ टक्के आहे तर मानधन देण्याची गरज नाही असे म्हणणारे प्रतिसादक ३०.३६ टक्के आहेत.

वरील विवेचनावरुन असे समजते की, निरक्षरांना प्रोत्साहन म्हणून मानधनाची खरोखरच गरज आहे. निरक्षर राहण्यामागचे मूळ कारण त्याची गरीबी व अज्ञान आहे. गरीबीमुळेच लहानपणी त्यांना कामावर जावे लागते, किंवा आई-वडील कामास जात असल्यास घरातील लहान मुलांचे, वृध्दांचे संगोपन, घरातील राहिलेली कामे करावी लागतात. गरीबीमुळे ही साखळी तशीच पुढे वाढत जाते. यासाठी प्रथम त्यांना आर्थिक सहाय्य करुन नियमित रोजगार मिळवून दयावा. आलेल्या निरक्षरांना थोडासा जरी मोबदला दिला तरी ते वर्गास नियमित उपस्थित राहतील व साक्षर होण्याचा प्रयत्न करतील. एकदा का साक्षर झाले की आपोआपच विचारात बदल होऊन विकासाचा व उन्नतीचा धागा त्यांना दिसेल म्हणून अल्पप्रमाणात कोणत्या ना कोणत्या स्वरुपात का होईना त्यांना मानधन दयावे.

मानधन देण्याची गरज नाही असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण ३०.३६ टक्के म्हणजे कमीच आहे. त्यांच्या मते शिकायचे असेल तर येतील, त्यांच्याकरिताच हे अभियान आहे. त्यासाठी मानधनाची गरज त्यांना वाटत नाही. पण संशोधिकेच्या मते पोटापाण्याचा प्रश्न सुटल्याशिवाय कोणालाही शिकण्याची इच्छा होणार नाही. इच्छा असली तरी या विवंचनेमुळे त्याला बाधाच निर्माण होईल.